दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2026-28

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २६६। किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - डॉ. सुदीप किसन हासे (एम.ई. पीएच. डी.) । रविवार ०१/११/२०२६ । पाने- ६



सिंहस्थ कुंभपर्वाचा शुभारंभ, राष्ट्रपती व मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक-त्र्यंबकेश्वरमध्ये आजपासून एका ऐतिहासिक आणि मंगलमय पर्वाची सुरुवात झाली आहे. देशाचे आणि जगाचे लक्ष लागून असलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याचा आज दुपारी १२ वाजून २ मिनिटांच्या अभिजित मुहूर्तावर विधीवत शुभारंभ झाला आहे. नाशिकच्या रामकुंडावर आणि त्र्यंबकेश्वरच्या कुशावर्त तीर्थावर एकाच वेळी धर्मध्वजारोहण पार पडले असून, भाविकांच्या अलोट गर्दीने गोदाकाठ दुमदुमून गेला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातील अनेक दिग्गज नेते या अभूतपूर्व सोहळ्याचे साक्षीदार होत आहेत.

पुढील २२ महिने चालणाऱ्या या महाकुंभपर्वाच्या पहिल्याच दिवशी प्रशासकीय आणि धार्मिक पातळीवर मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. नाशिकच्या रामकुंडावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत गोदावरी पूजन, यज्ञविधी आणि धर्मध्वजाची स्थापना केली जात आहे. या सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार आणि पालकमंत्री गिरीश महाजन उपस्थित आहेत.मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार प्रथमच त्र्यंबकचे ध्वजारोहण त्र्यंबकेश्वरमध्ये प्रथमच राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. कुशावर्त तीर्थावर शृंगेरी शारदा पीठाचे शंकराचार्य जगद्गुरू श्री श्री विधुशेखर भारती स्वामीजी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हा विधी पार पडत आहेत. आजच्या या मंगलमय दिवसाची सांगता सायंकाळी गोदावरी तीरावर होणाऱ्या भव्य महाआरतीने होणार असून, या माध्यमातून एक (पान २ वर)

अमृत उद्योग समूहाच्या वतीने इंदिरा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल यांना अभिवादन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - देशातील गरिबी हटाव चा नारा देऊन पाकिस्तानचे दोन तुकडे करणाऱ्या इंदिरा गांधी यांचे कणखर आणि खंबीर नेतृत्व देशाला मिळाले. बांगलादेशची निर्मिती बँकांचे राष्ट्रीयीकरण असे धाडसी निर्णय घेणाऱ्या इंदिराजींनी देशाच्या अखंडता व एकात्मतेसाठी बलिदान दिले. हे भारताच्या अखंडतेसाठी हुतात्मे असल्याचे प्रतिपादन काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा राज्याचे माजी महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावरील शक्ती स्थळ येथे अमृत उद्योग समूहाच्या वतीने इंदिरा गांधी यांच्या ४२ वा स्मृतिदिन व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. समवेत मा.नगराध्यक्ष सौ. दुर्गाताई तांबे, कारखान्याचे व्हा.चेअरमन पांडुरंग पा.घुले, रामहरी कातोरे, ॲड. नानासाहेब शिंदे, कारखान्याचे संचालक संपतराव गोडगे, (पान २ वर)



जलजीवनच्या कामांत दोषी आढळल्यास थेट गुन्हे दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर : कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होऊनही ग्रामीण भागातील नागरिकांची तहान भागविण्यात अपयशी ठरलेल्या जलजीवन मिशनच्या योजनांना आता गती देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. वर्षानुवर्षे रखडलेल्या पाणीपुरवठा योजनांचा तालुकानिहाय आढावा घेत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी ठेकेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांना कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. योजनांच्या कामात दिरंगाई अथवा अनियमितता आढळून आल्यास आणि त्यासाठी ठेकेदार जबाबदार असल्याचे निष्पन्न झाल्यास थेट गुन्हे दाखल करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. त्यामुळे जलजीवन मिशनच्या रखडलेल्या कामांबाबत आता प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात जलजीवन मिशन सुरू होऊन पाच वर्षांहून अधिक काळ लोटला असतानाही अनेक गावांतील पाणीपुरवठा योजनांची कामे अद्याप अपूर्ण आहेत. जिल्हा परिषदेमार्फत एकूण ८३० योजना सुरू करण्यात आल्या असून, त्यापैकी केवळ २७४ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत. या योजनांवर आतापर्यंत ९०० कोटी रुपयांहून अधिक खर्च झाला आहे. मात्र, एवढा मोठा निधी खर्च होऊनही जिल्ह्यातील ३६ गावांवर आजही टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ आली आहे. जिल्हा परिषद आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजनांवर मिळून आतापर्यंत सुमारे २ हजार ८०० कोटी रुपये खर्च झाले असतानाही अनेक योजनांचा प्रश्न कायम असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

दरम्यान, आगामी उन्हाळ्यात ग्रामीण भागातील नागरिकांना पुन्हा पाणीटंचाईच्या झळा सोसाव्या लागू नयेत, यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी स्वतः मैदानात उतरून योजनांच्या कामांचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. गेल्या चार दिवसांत त्यांनी संगमनेर, पारनेर, श्रीगोंदा आणि कर्जत या तालुक्यांना भेटी देत प्रत्यक्ष कामांची स्थिती जाणून घेतली. यावेळी रखडलेल्या कामांचा आढावा घेत संबंधित ठेकेदारांना कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

विशेषतः अंतिम टप्प्यात असलेल्या योजनांना प्राधान्य देऊन ती तातडीने पूर्ण करावीत, कामातील अडथळे दूर करावेत आणि नागरिकांना प्रत्यक्षात नियमित पाणीपुरवठा सुरू होईल, याची दक्षता घ्यावी, असे स्पष्ट निर्देश भंडारी यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. जलजीवन मिशनच्या योजनांवर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होऊनही अपेक्षित परिणाम दिसत नसल्याने आता कामांच्या गुणवत्तेची आणि प्रगतीची सखोल तपासणी केली जाणार आहे. यासाठी विशेष समिती स्थापन करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी घेतला आहे. ही समिती प्रत्यक्ष कामांची पाहणी करून त्यातील त्रुटी, अनियमितता आणि कामांच्या विलंबाची कारणे शोधणार आहे. तपासणीत दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई केली जाणार आहे. एकीकडे जलजीवन मिशनच्या माध्यमातून प्रत्येक घरापर्यंत नळाने पाणी पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले, तर दुसरीकडे कोट्यवधी रुपये खर्चूनही अनेक गावांमध्ये पाण्याची प्रतीक्षा कायम आहे. योजनांच्या अपूर्ण कामांमुळे नागरिकांना टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे आता केवळ आढावा बैठका आणि आश्वासनांपुरते न थांबता प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू होणे महत्त्वाचे ठरणार आहे. प्रशासनाच्या कठोर भूमिकेमुळे रखडलेल्या योजनांना खरोखरच गती मिळते का आणि दोषींवर कारवाई होते का, याकडे जिल्ह्यातील ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

संगमनेरमध्ये गोवंश कत्तलीचा अड्डा उद्‌ध्वस्थ

२ हजार किलो गोमांस जप्त, नऊ जण ताब्यात

संगमनेर - संगमनेर शहरातील अवैध गोवंश कत्तलीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेने कादरीनगर परिसरात धडक कारवाई करत गोवंशीय जनावरांची कत्तल सुरू असलेल्या ठिकाणावर छापा टाकला. या कारवाईत तब्बल १ हजार ९०० किलो गोमांस जप्त करण्यात आले असून, नऊ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. यामध्ये एका विधिसंघर्षित बालकाचाही समावेश आहे. दरम्यान, या कथित कत्तलखान्याचे सूत्रधार असल्याचा संशय असलेले दोन मुख्य आरोपी पोलिसांना गुंगारा देऊन फरार झाले आहेत. पोलिसांनी छोटा हत्ती वाहन, कुऱ्हाडी, सुरे, वजनकाटा आदी साहित्यांसह एकूण ९ लाख ७३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांची माहिती घेत असताना कादरीनगर परिसरातील गौसो रजा मस्जिदजवळील गल्ली क्रमांक २ व ३ येथे गोवंशीय जनावरांची कत्तल सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली. सोमू उर्फ आतीक रफीक कुरेशी आणि अनस सरवर कुरेशी हे काही साथीदारांच्या मदतीने गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री करत असल्याची माहिती पथकाला मिळाली. मिळालेल्या माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी पंचांसमक्ष संबंधित ठिकाणी धाव घेतली. त्यावेळी काही इसम प्रत्यक्ष गोवंशीय जनावरांची कत्तल करत असल्याचे आढळून आले.

(पान ५ वर)

जिल्हा परिषद निवडणुकीचे वेध; इच्छुकांच्या आशा पुन्हा पल्लवित!

साडेचार वर्षांपासून प्रशासकराज, ७५ गट आणि १५० गणांची रचना जाहीर

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर : सर्वोच्च न्यायालयाने जिल्हा परिषद निवडणुका घेण्याबाबत दिलेल्या निर्देशांनंतर अहिल्यानगर जिल्ह्यात राजकीय हालचालींची चर्चा पुन्हा सुरू झाली असून, निवडणुकीच्या प्रतीक्षेत असलेल्या इच्छुकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. गेल्या साडेचार वर्षांपासून जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांवर प्रशासकराज सुरू असल्याने लोकप्रतिनिधींच्या निवडीकडे ग्रामस्थांचेही लक्ष लागले आहे. मात्र, निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्यापूर्वीच पुन्हा काही तांत्रिक किंवा प्रशासकीय अडथळे निर्माण होणार नाहीत ना, अशी धाकधूक इच्छुकांना सतावत आहे.

ओबीसी आरक्षणाच्या मर्यादेसंदर्भातील खटला न्यायप्रविष्ट असतानाच सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक प्रक्रिया पुढे नेण्याचे निर्देश दिल्याने निवडणुकीचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र, राज्य निवडणूक आयोग यावर नेमकी कोणती भूमिका घेणार, निवडणुकीचा कार्यक्रम कधी जाहीर करणार आणि प्रत्यक्ष मतदान कधी होणार, याबाबत अद्याप अनिश्चितता कायम आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थिती, वाढते तापमान, मतदार याद्यांमधील त्रुटी आणि प्रशासकीय यंत्रणेवरील कामाचा ताण या बाबी निवडणूक प्रक्रियेसमोर आव्हान ठरू शकतात.

गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणांची प्रारूप रचना जाहीर करण्यात आली होती. त्यानुसार जिल्ह्यात जिल्हा परिषदेचे ७५ गट आणि पंचायत समित्यांचे १५० गण निश्चित करण्यात आले. कर्जत आणि जामखेड या दोन्ही तालुक्यांत प्रत्येकी एक गट वाढल्याने तेथील इच्छुकांची संख्याही वाढली. संगमनेर तालुक्यात सर्वाधिक गट असून, नगर तालुक्यातही फेररचनेमुळे राजकीय समीकरणांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. यापूर्वी २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत जिल्हा परिषदेचे ७३ गट आणि पंचायत समित्यांचे १४६ गण होते. मात्र, आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याच्या मुद्द्यावरून निवडणूक प्रक्रिया रखडली आणि इच्छुकांच्या तयारीवर पाणी फिरले. अहिल्यानगर जिल्हा परिषदेवर आजवर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व राहिले आहे. २०१७ च्या निवडणुकीत काँग्रेसने २३, तर राष्ट्रवादी काँग्रेसने १८ जागा जिंकत जिल्हा परिषदेत आपले राजकीय बळ दाखवून दिले होते. त्यानंतर शालिनीताई विखे पाटील आणि राजश्री घुले यांनी अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. मात्र, बदललेल्या राजकीय परिस्थितीत आगामी निवडणुकीत कोणत्या पक्षाचे किती वर्चस्व राहणार, याची उत्सुकता राजकीय वर्तुळात आहे.

यंदा जिल्हा परिषद अध्यक्षपद अनुसूचित जमातीच्या महिलेसाठी राखीव असल्याने पुन्हा एकदा महिलेला अध्यक्षपदाची संधी मिळणार आहे. त्यामुळे या आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर संबंधित गटांमध्ये इच्छुकांची मोर्चेबांधणी सुरू होण्याची शक्यता आहे. अध्यक्षपदाच्या आरक्षणामुळे जिल्ह्यातील राजकीय समीकरणांना वेगळे वळण मिळू शकते. अहिल्यानगर जिल्हा परिषदेत एप्रिल २०२२ पासून प्रशासकराज सुरू आहे. प्रारंभी संभाजी लांगोरे, त्यानंतर आशिष येरेकर आणि सध्या आनंद भंडारी हे प्रशासक म्हणून काम पाहत आहेत. केवळ जिल्हा परिषदच नव्हे, तर जिल्ह्यातील तब्बल ७६५ ग्रामपंचायतींच्या निवडणुकाही रखडल्या असल्याने तेथे प्रशासकांच्या माध्यमातून कारभार सुरू आहे. पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदेची यंत्रणाही प्रशासकीय नियंत्रणाखाली आहे.

देशात पंचायतराज व्यवस्थेअंतर्गत ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांना ग्रामविकासातील महत्त्वाचे स्थान आहे. मात्र, या संस्थांवर दीर्घकाळ लोकप्रतिनिधी नसल्याने स्थानिक प्रश्नांची मांडणी, विकासकामांचे प्राधान्यक्रम आणि नागरिकांच्या अपेक्षांना लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून मिळणारे व्यासपीठ मर्यादित झाले आहे. प्रशासकीय यंत्रणेवरही अतिरिक्त जबाबदारी पडत आहे. सध्या जिल्ह्यातील बहुतांश प्रमुख नेते जिल्हा बँकेच्या निवडणुकीत व्यग्र आहेत. दुसरीकडे कार्यकर्ते आणि इच्छुकांनी ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीच्या तयारीकडे लक्ष केंद्रित केले आहे. अनेकांनी मागील काही वर्षांत निवडणुकीच्या अपेक्षेने मोठा खर्च करून संपर्क वाढवला, सामाजिक उपक्रम राबवले आणि राजकीय मोर्चेबांधणी केली. मात्र, वारंवार निवडणुका पुढे ढकलल्या गेल्याने काही इच्छुकांचा उत्साह मावळला असून, काहींनी तर निवडणुकीचा नादच सोडल्याची चर्चा आहे. आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांमुळे निवडणुकीच्या आशा पुन्हा जाग्या झाल्या असल्या, तरी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम जाहीर होईपर्यंत अनिश्चिततेचे सावट कायम राहणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील इच्छुकांसह सर्वसामान्य ग्रामस्थांचे लक्ष राज्य निवडणूक आयोगाच्या पुढील निर्णयाकडे लागले आहे. साडेचार वर्षांच्या प्रशासकराजानंतर जिल्हा परिषदेत पुन्हा लोकप्रतिनिधींची सत्ता कधी येणार, हाच सध्या जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळातील कळीचा प्रश्न ठरला आहे.

जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये दिवाळी उत्सव

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शुक्रवार, दिनांक ३० ऑक्टोबर रोजी दिवाळीचा उत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला.

भारतीय संस्कृती आणि परंपरांचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने सहशिक्षिका रोहीनी दिघे यांनी दिवाळीतील एकादशी, वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, दिवाळी पाडवा आणि भाऊबीज या सणांचे पारंपरिक व वैज्ञानिक महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. केवळ सण साजरे न करता त्यामागील विचार, परंपरा आणि निसर्गाशी असलेले नाते समजून घेण्याचा संदेश शाळेचे संस्थापक अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार, व सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने देण्यात आला. शाळेच्या प्राचार्या सौ. जिज्ञासा कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना दिवाळीच्या मनःपूर्वक शुभेच्छा देत भारतीय संस्कृतीचे जतन करताना वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्याचे आणि पर्यावरण संवर्धनात आपले योगदान देण्याचे आवाहन केले.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी फटाकेमुक्त व पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करावी, तसेच ध्वनी आणि वायुप्रदूषण टाळून आनंदाचा सण जबाबदारीने साजरा करावा, असे आवाहन उपप्राचार्या सौ. माधुरी शेवाळे यांनी विद्यार्थ्यांना केले. एकादशी ते भाऊबीज या सर्व सहा दिवसांचे भारतीय संस्कृतीतील महत्त्व सांगण्यात आले. दिवाळीच्या सुरेल गीतांनी, आकर्षक सजावटीने आणि विद्यार्थ्यांच्या उत्साहाने शाळेचा संपूर्ण परिसर आनंदमय झाला होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका श्रद्धा मापारी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्या, उपप्राचार्यां, समन्वयक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. परंपरेचा सन्मान, विज्ञानाची जाण आणि पर्यावरणाचे भान असा सुंदर संदेश देत व सर्व विद्यार्थ्यांना दिवाळीच्या भरभरून शुभेच्छा देत जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलचा दिवाळी उत्सव उत्साहात संपन्न झाला.

पान १ वरून सिंहस्थ कुंभपर्वाचा शुभारंभ, राष्ट्रपती...

नवा विश्वविक्रम नोंदवण्याची जय्यत तयारी प्रशासनाने केली आहे.नाशिक आणि त्र्यंबकेश्वर या दोन धार्मिक शहरांमध्ये दर १२ वर्षांनी महाकुंभ भरतो. लाखो भाविक गोदावरी नदीत पवित्र स्नान करतात. नाशिकमध्ये रामकुंड आणि त्र्यंबकेश्वर येथे कुशावर्त तीर्थावर स्नान केले जाते.

जगभरातून कोट्यवधी भाविक नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे येण्याची अपेक्षा आहे. याच कार्यक्रमात शंखनादाच्या माध्यमातून बनवलेल्या गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्रही प्रदान केले जाईल. यापूर्वी शुक्रवारी नाशिकमध्ये महाध्वज ग्रामपरिक्रमा काढण्यात आली. राष्ट्रपती भवनाच्या निवेदनानुसार, राष्ट्रपती या प्रसंगी कार्यक्रमाला संबोधितही करतील.२० महिने चालणाऱ्या कुंभमेळ्यात नाशिकमध्ये स्नानाचे ४४ मुहूर्त आणि त्र्यंबकेश्वरमध्ये ५३ मुहूर्त आहेत. सरकारच्या अंदाजानुसार, नाशिकमध्ये ८-१० कोटी आणि त्र्यंबकेश्वरमध्ये ४ कोटी भाविक येतील.

नाशिक कुंभमेळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे येथे वैष्णव आणि शैव आखाड्यांचे स्नान वेगवेगळ्या तीर्थस्थळांवर होते. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरकडे एकाच आयोजनाची दोन प्रमुख केंद्रे म्हणून पाहिले जाते.नाशिकच्या कुंभाला सिंहस्थ असे म्हणतात, कारण त्याच्या पारंपरिक ज्योतिषीय गणनेत बृहस्पतीचा सिंह राशीत प्रवेश विशेष महत्त्वाचा मानला जातो. कुंभाच्या तारखा केवळ सामान्य दिनदर्शिकेच्या आधारे ठरवल्या जात नाहीत; यामध्ये धार्मिक परंपरा, ग्रहांची स्थिती आणि आखाड्यांची सहमती यांची भूमिका असते.

हिंदू मान्यतेनुसार, समुद्रमंथनाच्या वेळी अमृतकलशासाठी देव आणि असुर यांच्यात संघर्ष झाला होता. अशी मान्यता आहे की अमृताचे थेंब प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन आणि नाशिक या चार ठिकाणी पडले होते. त्यामुळे या ठिकाणी कुंभमेळ्याची परंपरा जोडली गेली आहे.

संगमनेरकरांना घरपट्टी, पाणीपट्टीत ५० टक्के सवलत द्या

दुष्काळामुळे साक्षी सूर्यवंशी यांची नगराध्यक्षांकडे मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शासनाने संगमनेर तालुका दुष्काळग्रस्त घोषित केल्यानंतर ग्रामीण भागातील नागरिकांना विविध सवलती व मदतीच्या माध्यमातून दिलासा देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, दुष्काळाच्या झळा शहरातील नागरिक, व्यापारी, छोटे व्यावसायिक आणि सर्वसामान्य कुटुंबांनाही बसत असल्याने संगमनेर शहरातील नागरिकांनाही घरपट्टी व पाणीपट्टीमध्ये ५० टक्क्यांपर्यंत सवलत द्यावी, अशी मागणी शिवसेनेच्या नगरसेविका साक्षी विनोद सूर्यवंशी यांनी नगराध्यक्षांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

तालुक्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम होत आहे. शेती आणि शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून असलेल्या नागरिकांच्या उत्पन्नावर मर्यादा आल्या आहेत. याचा अप्रत्यक्ष फटका शहरातील व्यापार, छोटे व्यवसाय आणि सर्वसामान्य कुटुंबांनाही बसत आहे. अशा परिस्थितीत नगरपरिषदेने नागरिकांच्या आर्थिक अडचणींचा विचार करून करांमध्ये सवलत देण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी भूमिका निवेदनात मांडण्यात आली आहे. या निवेदनातून चालू आर्थिक वर्षासाठी संगमनेर शहरातील निवासी मालमत्ताधारकांना घरपट्टीमध्ये ५० टक्क्यांपर्यंत सवलत देण्याची मागणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर नागरिकांच्या पाणीपट्टीतही ५० टक्क्यांपर्यंत कपात करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागणीवर निर्णय घेण्यासाठी नगरपरिषदेच्या विशेष सर्वसाधारण सभेत तातडीने प्रस्ताव मांडून ठराव मंजूर करावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. तसेच या सवलती देण्याबाबत आवश्यक कायदेशीर तरतुदींची तपासणी करावी. नगरपरिषदेच्या अधिकारक्षेत्राबाहेरील बाबींसाठी जिल्हाधिकारी, नगर प्रशासन संचालनालय आणि नगरविकास विभागाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवावा, अशीही मागणी या निवेदनात सौ. सुर्यवंशी यांनी केली आहे. शासनाने तालुका दुष्काळग्रस्त घोषित केल्यानंतर शहरातील नागरिकांना कोणत्या शासकीय सवलती लागू होऊ शकतात, याबाबत नगरपरिषदेने अधिकृत माहिती आणि कायदेशीर अभिप्राय सादर करावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दुष्काळाचे संकट केवळ ग्रामीण भागापुरते मर्यादित नसून त्याचे आर्थिक परिणाम शहरातील प्रत्येक घटकाला भोगावे लागत आहेत. त्यामुळे दुष्काळग्रस्त तालुक्यातील शहरवासीयांनाही दिलासा मिळणे आवश्यक आहे. नगरपरिषदेने नागरिकांच्या आर्थिक हिताचा विचार करून घरपट्टी आणि पाणीपट्टीतील सवलतीबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

पान १ वरून - अमृत उद्योग समूहाच्या...

संतोष हासे, गुलाबराव देशमुख, अंकुश ताजने,रावसाहेब दुबे, बंडु नाना भाबड, मदन आंबरे, विजय राहणे, विलास कवडे, सिताराम वर्पे, जगन आव्हाड, प्राचार्य केशवराव जाधव, प्रा.बाबा खरात, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, प्राचार्य व्ही.बी. धुमाळ, किरण कानवडे, कृष्णा दिघे, तात्या कुटे, सौ. सुंदराबाई दुबे आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, स्व.इंदिरा गांधी हे देशाचे कणखर नेतृत्व होते. देशातील गरिबी हटाव नारा देण्याबरोबर,बँकांचे राष्ट्रीयकरण, संस्थांचे विलीनीकरण असे धाडसी निर्णय त्यांनी घेतले. पाकिस्तानचे दोन तुकडे करून त्यांनी बांगलादेशची निर्मिती करून जगाचा नकाशा बदलविला.भारत हा देश एक राहिला पाहिजे हा विचार त्यांनी कायम दिला. देशाच्या एकात्मतेसाठी आणि अखंडतेसाठी त्यांनी हुतात्मे पत्करले. याचबरोबर स्वातंत्र्य चळवळीत योगदान दिल्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मंत्रिमंडळामध्ये सरदार वल्लभ भाई पटेल यांनी गृहमंत्री म्हणून देशाच्या एकात्मतेसाठी मोठे काम केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुमारे ४०% देश हा विविध संस्थांमध्ये विभागला होता. या सर्व संस्थांना देशांमध्ये विलीनीकरणाचे काम त्यांनी केले. या थोर राष्ट्रपुरुषांचा विचार करून देशाची एकात्मता आणि अखंडता राखण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध रहावे असे आवाहन त्यांनी केले.

तर सौ.दुर्गाताई तांबे म्हणाल्या की, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांना स्वर्गीय इंदिराची गांधी यांच्या कणखर नेतृत्वाबद्दल मोठा नितांत आदर होता. इंदिराजींच्या कार्यातून पुढील पिढीला प्रेरणा मिळावी यासाठी त्यांनी नवी दिल्लीच्या धर्तीवर अमृत उद्योग समूहामध्ये शक्तिस्थळ निर्माण केले आहे. दरवर्षी या ठिकाणी विविध तज्ञांची व्याख्याने आयोजित करून इंदिराजींना अभिवादन केले जाते. इंदिरा गांधी यांना लहानपणापासूनच त्यांना देशप्रेमाचे संस्कार मिळाले. राजकीय क्षेत्रात आल्यानंतर सुरुवातीला विरोधकांनी त्यांना गुंगी गुडिया म्हणून हिणवले. मात्र जागतिक पातळीवर आपल्या कर्तुत्वाने ठसा उमटवणाऱ्या इंदिराजी ह्या देशाच्या कणखर पंतप्रधान ठरल्या असे त्या म्हणाल्या.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

जिल्हा बँकेचा मंगळवारी फैसला!

३ नोव्हेंबरला मतमोजणी; कोण मारणार बाजी, नेत्यांची प्रतिष्ठा पणाला

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीचा रणसंग्राम आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. बँकेच्या सत्तेची चावी कोणाच्या हाती जाणार आणि जिल्ह्यातील कोणत्या राजकीय नेत्याचे वर्चस्व सिद्ध होणार, याचा फैसला येत्या मंगळवारी (दि. ३ नोव्हेंबर) होणार आहे. सोमवारी (दि. २ नोव्हेंबर) जिल्ह्यातील १० संचालकपदांसाठी मतदान होणार असून, दुसऱ्याच दिवशी सकाळी आठ वाजल्यापासून नगर-कल्याण महामार्गावरील नेप्ती येथील अमरज्योत लॉन्समध्ये मतमोजणीला सुरुवात होणार आहे.

जिल्हा बँकेच्या एकूण २१ संचालकपदांपैकी ११ जागा यापूर्वीच बिनविरोध झाल्या आहेत. त्यामुळे उर्वरित १० जागांसाठी होणारी निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची बनली आहे. सहकार क्षेत्रातील वर्चस्वाबरोबरच जिल्ह्याच्या राजकारणातील आगामी समीकरणांच्या दृष्टीनेही या निवडणुकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या निवडणुकीत सभापती राम शिंदे, खासदार नीलेश लंके, माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासह जिल्ह्यातील प्रमुख राजकीय नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. सुरुवातीपासूनच निवडणूक बिनविरोध करण्यासाठी पडद्यामागे जोरदार हालचाली सुरू होत्या. मात्र, विविध मतदारसंघांतील राजकीय समीकरणे, गटांतर्गत मतभेद आणि इच्छुकांची संख्या यामुळे सर्व जागांवर एकमत होऊ शकले नाही. परिणामी, दहा जागांसाठी प्रत्यक्ष मतदानाची वेळ आली आहे.

आता मतदानाच्या दिवशी मतदार कोणाच्या पारड्यात कौल टाकतात, यावर अनेक दिग्गजांचे राजकीय वजन ठरणार आहे. कोणत्या गटाला किती जागा मिळतात, कोणत्या नेत्याचा प्रभाव कायम राहतो आणि जिल्हा बँकेच्या आगामी सत्ताकारणाची दिशा कोणती असेल, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

३३ मतदान केंद्रांवर होणार मतदान- जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये मतदानासाठी एकूण ३३ केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. या निवडणुकीत ३ हजार ८३७ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदान प्रक्रिया शांततेत आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणेने तयारी पूर्ण केली असून, अधिकारी-कर्मचारी तसेच पोलिसांचा स्वतंत्र बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

मतमोजणी केंद्र परिसरात जमावबंदी- मतमोजणीसाठी नेप्ती येथील अमरज्योत लॉन्सची निवड करण्यात आली आहे. मंगळवारी सकाळी आठ वाजता मतमोजणी सुरू होणार असून, निकालाकडे राजकीय पक्षांसह सहकार क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मतदारांचे लक्ष असेल. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी मतमोजणी केंद्राच्या १०० मीटर परिसरात जमावबंदी लागू राहणार आहे.

एकीकडे बिनविरोध झालेल्या ११ जागांचे गणित स्पष्ट झाले असले, तरी उर्वरित दहा जागांचा निकाल जिल्ह्याच्या सहकार आणि राजकारणातील पुढील सत्तासमीकरणे ठरवणार आहे. त्यामुळे सोमवारी मतदान आणि मंगळवारी मतमोजणी, या दोन दिवसांत जिल्हा बँकेच्या राजकारणाचा खरा कस लागणार आहे.

डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या पुढाकारातून आदिवासी चिमुकल्यांना मायेची उब!

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राजकारण हे केवळ सत्तेसाठी नसून समाजातील गोरगरीब, वंचित आणि दुर्बल घटकांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचे प्रभावी माध्यम आहे ही लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी जपलेली सामाजिक सेवेची परंपरा डॉ. जयश्रीताई थोरात पुढे नेत आहेत. याच भावनेतून त्यांच्या पुढाकाराने एकविरा फाउंडेशन आणि बीएसटी आर्मीच्या संयुक्त विद्यमाने संगमनेर तालुक्यातील आदिवासी व मागासवर्गीय वस्त्यांमधील जिल्हा परिषद शाळांतील ३०० विद्यार्थ्यांना उबदार स्वेटरचे वाटप करण्यात आले. थंडीच्या दिवसांत या चिमुकल्यांना स्वेटरच्या माध्यमातून मायेची ऊब मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.

संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी येथील आनंदवाडी, जावळे वस्ती, ठाकरवाडी, सावरगाव तळ येथील गाडेवस्ती, सतीची वाडी, डोळासणे येथील डुबे वाडी, खैरेदरा आणि गिरेवाडी या ठिकाणी हा उपक्रम राबविण्यात आला. एकविरा फाउंडेशन व विदेशात कार्यरत असलेल्या बीएसटी आर्मीच्या सदस्यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना स्वेटरचे वाटप करण्यात आले.

यावेळी आदिवासी सेवक प्रा. बाबा खरात, तालुकाध्यक्ष बाळकृष्ण गांडाळ, यशोधन कार्यालयातील शर्मिला हांडे, ज्योती थोरात, श्रद्धा कढणे, वंदना राहणे, उज्ज्वला राहणे, प्राजक्ता घुले, वंदना शर्माळे, हर्षल काकड यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, शिक्षक, पालक व नागरिक उपस्थित होते.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली एकविरा फाउंडेशनच्या माध्यमातून महिला सबलीकरणासह विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जातात. समाजातील वंचित घटकांना मदतीचा हात देणे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणे या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. याच सामाजिक बांधिलकीतून बीएसटी आर्मीच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी बोलताना आदिवासी सेवक प्रा. बाबा खरात म्हणाले की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी घालून दिलेले सामाजिक सेवेचे संस्कार लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी जपले आहेत. त्याच विचारांचा वारसा डॉ. जयश्रीताई थोरात पुढे नेत असून त्या गोरगरीब आणि आदिवासी समाजाच्या सेवेसाठी सातत्याने कार्यरत आहेत. शिक्षणाच्या माध्यमातूनच आदिवासी आणि गोरगरीब समाजाची प्रगती शक्य आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळते आणि समाजात खऱ्या अर्थाने आनंद निर्माण होतो. हा अत्यंत पुण्याचा उपक्रम असल्याचे त्यांनी सांगितले.

बाळकृष्ण गांडाळ म्हणाले की, आदिवासी आणि गोरगरीब समाजातील नागरिकांनी कायमच बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वावर विश्वास आणि प्रेम व्यक्त केले आहे. त्यांनीही आपल्या कार्यातून सर्वसामान्यांच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शर्मिला हांडे यांनी केले, तर ज्योती थोरात यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२०२६ म्हणजे २०११ ची पुनरावृत्ती!

तेंव्हा 'भ्रष्टाचार हटाव', आज 'व्होट चोरी'

सत्तेसाठी राजकारण तेच, मग विरोधकांचे निकष वेगळे का?

२०१४ ची तयारी भाजपने २०११ पासून सुरू केली. आज काँग्रेसने २०२९ ची लढाई २०२६ पासून सुरू केली. तेव्हा विरोधासाठी चेहरे वापरले होते आण्णा हजारे, केजरीवाल, सुब्रमण्यम स्वामी, रामदेवबाबा, तर आता वापरले जात आहे अभिजीत दिपके, नेहा बोरा, नेहा सिंग राठोड, धृव राठी. २०११ ला मुद्दा होता भ्रष्टाचार, महागाई, काळे धन. आज मुद्दा आहे वोट चोरी, स्वायत्त संस्थावर कब्जा. तेव्हा राहुल गांधी टार्गेट होते तर आज नरेंद्र मोदी. याचाच अर्थ तेव्हा भाजपला सत्ता मिळवायची होती आणि आज काँग्रेसला. या सर्वसामान्य जनता मात्र कुठेही दिसत नाही.

राजकारणात एक गंमत असते. विरोधात असताना जे आंदोलन लोकशाहीचे रक्षण करणारे वाटते, तेच आंदोलन सत्तेत आल्यानंतर सत्तेला आव्हान देणारे ठरते. विरोधात असताना जे आरोप जनतेचा आवाज वाटतात, तेच आरोप सत्ताधाऱ्यांना राजकीय कटकारस्थान वाटतात. आणि सत्तेत असताना जे नेते आंदोलनकर्त्यांना लोकशाहीचा आधारस्तंभ म्हणतात, तेच नेते आपल्याविरोधात आंदोलने सुरू झाली की त्यांच्यामागे राजकीय हेतू शोधू लागतात. आज २०२६ मध्ये भारतीय राजकारणाकडे पाहताना २०११ च्या घटनांची आठवण होणे स्वाभाविक आहे. तेव्हा केंद्रात काँग्रेसची सत्ता होती आणि भाजपला सत्तेत यायचे होते. आज केंद्रात भाजपची सत्ता आहे आणि काँग्रेसला ती उलथवून टाकायची आहे. तेव्हा भ्रष्टाचार, महागाई आणि काळ्या पैशाच्या मुद्द्यांवरून काँग्रेसला घेरले जात होते. आज मतदारयाद्या, कथित मतचोरी, संविधान आणि लोकशाहीच्या संस्थांच्या स्वायत्ततेवरून भाजपला घेरण्याचा प्रयत्न होत आहे. तेव्हा भाजपने जे राजकारण केले, ते योग्य होते असे मानायचे असेल, तर आज त्याच धर्तीवर काँग्रेस करत असलेल्या राजकारणाला चुकीचे कसे म्हणणार? हा प्रश्न प्रत्येक राजकीय पक्षाच्या समर्थकांनी स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.

२०११ : आंदोलनाच्या केंद्रस्थानी भ्रष्टाचार, लक्ष्य काँग्रेस सरकार!

२०११ मध्ये देशाचे राजकीय वातावरण प्रचंड तापले होते. टूजी स्पेक्ट्रम, कोळसा खाणवाटप आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांशी संबंधित कथित गैरव्यवहारांच्या आरोपांमुळे तत्कालीन यूपीए सरकार अडचणीत आले होते. महागाईने सामान्य नागरिक त्रस्त होता. अशा वातावरणात अण्णा हजारे यांनी जनलोकपालच्या मागणीसाठी आंदोलन सुरू केले आणि देशभरात भ्रष्टाचारविरोधी जनभावना उफाळून आली. अण्णा हजारे यांच्या आंदोलनाला अरविंद केजरीवाल, किरण बेदी आणि प्रशांत भूषण यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा सहभाग मिळाला. बाबा रामदेव यांनीही काळ्या पैशाच्या मुद्द्यावरून आंदोलन उभे केले. माध्यमांमधून आंदोलनाला व्यापक प्रसिद्धी मिळाली. भाजपने थेट आणि पडद्यामागे काँग्रेस सरकारविरोधातील या वातावरणाचा राजकीय फायदा घेतला. त्यानंतर २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपने भ्रष्टाचारमुक्त शासन, विकास आणि महागाईवरील नियंत्रणाची आश्वासने देत सत्ता मिळवली. काँग्रेसचा दारुण पराभव झाला. तेव्हा भाजपची भूमिका काय होती? सरकारला प्रश्न विचारा, भ्रष्टाचाराचे आरोप करा, रस्त्यावर उतरा, आंदोलन करा आणि सत्ताधाऱ्यांना जाब विचारा. भाजपने हे केले तेव्हा त्याला लोकशाहीतील प्रभावी विरोधकाचे काम म्हटले गेले.

मग आज काँग्रेसने हेच केले, तर त्यात गैर काय?

देशात भ्रष्टाचार संपवायचा असेल, तर स्वतंत्र आणि प्रभावी यंत्रणा हवी, अशी मागणी करण्यात आली. लाखो लोकांनी या मागणीला पाठिंबा दिला. लोकपाल व लोकायुक्त कायदा संसदेने डिसेंबर २०१३ मध्ये मंजूर केला. पण त्यातून भ्रष्टाचार थांबला का? आंदोलनातून निर्माण झालेल्या अपेक्षा कितपत पूर्ण झाल्या, हा प्रश्न कायम राहिला. . त्याचप्रमाणे भ्रष्टाचाराच्या नावाखाली झालेल्या प्रत्येक आरोपाचे काय झाले, याचाही हिशेब मागायला हवा. काही प्रकरणांमध्ये न्यायालयीन निकाल लागले, काही आरोप सिद्ध झाले नाहीत. अनेक भ्रष्ट नेते भाजपमध्ये गेले म्हणून ते शुद्ध झाले का? २०१४ पूर्वी महागाईवरून काँग्रेसला धारेवर धरणाऱ्या भाजपने सत्तेत आल्यानंतर सामान्य माणसाच्या महागाईविषयक सर्व समस्या सोडवल्या का? प्रत्येक कुटुंबाला पुरेसा रोजगार मिळाला का? शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे प्रश्न संपले का? भ्रष्टाचाराविरुद्धची लढाई अपेक्षित परिणामांपर्यंत पोहोचली का? या प्रश्नांची उत्तरे केवळ नाही असे आहे. आणि हाच न्याय आज काँग्रेसलाही लागू होतो. काँग्रेसने केलेला प्रत्येक आरोप सत्य आहे, असे गृहीत धरता येणार नाही. मात्र, काँग्रेसने प्रश्न विचारले म्हणून ते प्रश्नच विचारू नयेत, असेही म्हणता येणार नाही.

२०२६ : भाजपच्या विरोधात काँग्रेसची नवी आघाडी

आज काँग्रेस 'व्होट चोर, गद्दी छोड' या घोषणेच्या माध्यमातून भाजपला आव्हान देत आहे. राहुल गांधी यांनी मतदारयाद्यांमधील कथित अनियमितता, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. काँग्रेसने काही मतदारसंघांतील आकडेवारीच्या आधारे मतचोरीचे आरोप केले आहेत. निवडणूक आयोगाने हे आरोप फेटाळले आहेत. मात्र, राजकीय डावपेचांच्या दृष्टीने पाहिले, तर काँग्रेसची रणनीती समजून घेणे अवघड नाही. ज्या मुद्द्यामुळे जनतेमध्ये असंतोष निर्माण होऊ शकतो, तो मुद्दा सातत्याने मांडायचा. पत्रकार परिषदा घ्यायच्या, सभा घ्यायच्या, सोशल मीडियावर व्हिडिओ प्रसारित करायचे, सरकारला प्रश्न विचारायचे आणि या मुद्द्याभोवती देशव्यापी जनमत तयार करण्याचा प्रयत्न करायचा.

२०११ मध्ये भ्रष्टाचारविरोधी आंदोलनामुळे काँग्रेसविरोधी वातावरण निर्माण झाले. आज काँग्रेस मतदारयाद्या आणि निवडणूक प्रक्रियेच्या मुद्द्यांवरून भाजपविरोधी वातावरण निर्माण होत आहे. तेव्हा भाजपने जनतेच्या असंतोषाला राजकीय दिशा दिली; आज काँग्रेस तसाच प्रयत्न करत आहे. दोन्ही काळांतील प्रत्येक घटना सारखी नाही. पण राजकीय रणनीतीचा मूलभूत ढाचा सारखा दिसतो, हे नाकारता येत नाही.

तेव्हा आयटी सेल, आज इन्स्टाग्राम!

२०११ मध्ये आंदोलनांना वृत्तवाहिन्यांची प्रसिद्धी, वर्तमानपत्रांतील मथळे, फेसबुक, ट्विटर आणि प्रत्यक्ष जनसभांचा आधार मिळाला. भाजपच्या आयटी सेलने जे खरे खोटे पसरवले त्याने अनेक जणांचे मतपरिवर्तन केले. आज राजकारणाचे मैदान आणखी बदलले आहे. इन्स्टाग्राम रील्स, यूट्यूब व्हिडिओ, व्हायरल क्लिप्स, मीम्स आणि डिजिटल मोहिमा जनमत घडवण्याचे महत्त्वाचे साधन बनले आहेत. आज काँग्रेसही या माध्यमांचा आक्रमक वापर करत आहे. काही सेकंदांच्या व्हिडिओतून सरकारला प्रश्न विचारले जातात. एखादी घोषणा देशभर पोहोचवली जाते. एखाद्या घटनेला व्यापक राजकीय अर्थ दिला जातो. समर्थक ती पुढे पसरवतात, विरोधक त्याला उत्तर देतात आणि काही तासांत राजकीय वातावरण तापते. याचा अर्थ डिजिटल माध्यमांवर होणारा प्रत्येक प्रचार खोटा असतो, असा नाही. मात्र, भाजपच्या समर्थकांनी डिजिटल प्रचाराला राजकीय कौशल्य मानायचे आणि काँग्रेसच्या समर्थकांनी केलेल्या त्याच प्रकारच्या प्रचाराला दिशाभूल म्हणायचे, हा दुहेरी निकष नक्कीच तपासला पाहिजे. खोटा दावा कोणत्याही पक्षाने केला, तरी तो खोटाच असतो. पण योग्य प्रश्न उपस्थित केला असेल, तर तो विरोधकांनी केला म्हणून चुकीचा ठरत नाही.

मग भाजप बरोबर होता, तर काँग्रेस चूक कशी?

२०११ मध्ये भाजपने काँग्रेस सरकारला भ्रष्टाचार, महागाई आणि प्रशासनातील त्रुटींवरून घेरले. काँग्रेसने त्या वेळी आंदोलनामागे राजकारण असल्याचे म्हटले असते, तरी त्यामुळे आंदोलनातील सर्व प्रश्न आपोआप निरर्थक ठरले नसते. जनतेला सरकारच्या कामकाजाबद्दल प्रश्न विचारण्याचा अधिकार होता आणि आहे. आज काँग्रेस भाजपला निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमितता, मतदारयाद्या आणि लोकशाही संस्थांच्या स्वायत्ततेवरून प्रश्न विचारत आहे. भाजपला हे राजकीय हेतूने प्रेरित वाटत असेल, देशद्रोही म्हणून खोटे आरोप करीत असले तरी त्यामुळे काँग्रेसचे सर्व प्रश्न आपोआप चुकीचे ठरत नाहीत. तेव्हा भाजपने काँग्रेसविरोधात जनतेच्या प्रश्नांना राजकीय आंदोलनाचे रूप दिले, तर आज काँग्रेस भाजपविरोधात तेच करत आहे. तेव्हा भाजपचा विरोध हा लोकशाहीचा आवाज होता, तर आज काँग्रेसचा विरोध हा केवळ राजकीय स्टंट कसा? उलट, जर भाजपला विरोधक म्हणून जनतेच्या प्रश्नांवर आंदोलन करण्याचा अधिकार होता, तर काँग्रेसलाही तोच अधिकार आहे. जर भाजपला सत्ताधाऱ्यांना जाब विचारणे योग्य वाटत होते, तर आज काँग्रेसने जाब विचारल्यावर भाजपनेही त्याला उत्तर द्यायला हवे. जर भाजपने २०११ मध्ये जनतेच्या असंतोषाचा राजकीय फायदा घेतला, तर काँग्रेस आज तसा फायदा घेण्याचा प्रयत्न करत असेल, तर त्यात लोकशाहीच्या दृष्टीने मूलभूत गैर काय? राजकारणात समान निकष असावेत, एवढीच अपेक्षा.

सत्ताधारी बदलले, पण राजकीय सोय कायम!

आपल्याकडे विरोधकांनी आंदोलन केले की त्यांना प्रसिद्धीची हाव असल्याचे सांगितले जाते. सरकारवर आरोप झाले की विरोधकांना सत्तेची घाई झाल्याचे म्हटले जाते. सोशल मीडियावर सरकारविरोधी संदेश पसरले की त्यामागे राजकीय अजेंडा असल्याचा आरोप होतो. पण हेच प्रकार सत्ताधारी पक्ष विरोधात असताना करतात, तेव्हा त्याला जनजागृती आणि लोकशाहीची लढाई म्हटले जाते. राजकीय पक्षांना सत्ता मिळवायची असते, यात गैर काहीच नाही. लोकशाहीत निवडणूक लढवणे, सरकारला विरोध करणे आणि जनतेचे समर्थन मिळवणे हे प्रत्येक पक्षाचे अधिकार आहेत. प्रश्न आहे तो या अधिकारांसाठी वापरल्या जाणाऱ्या निकषांचा. सरकारविरोधी आंदोलनाला केवळ विरोधकांचे राजकारण म्हणून नाकारता येणार नाही. त्याचप्रमाणे आंदोलनात मांडलेल्या प्रत्येक दाव्याला पुराव्यांशिवाय अंतिम सत्यही मानता येणार नाही. सरकारने उत्तर द्यावे, विरोधकांनी पुरावे द्यावेत आणि जनतेने दोन्ही बाजू तपासून निर्णय घ्यावा, हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे.

सामान्य माणूस मात्र पुन्हा त्याच जागी!

२०११ मध्ये जनतेला भ्रष्टाचारमुक्त भारताचे स्वप्न दाखवण्यात आले. आज लोकशाहीचे रक्षण आणि मताधिकाराच्या संरक्षणाचा मुद्दा पुढे केला जात आहे. त्या वेळी काँग्रेस सत्तेत होती, आज भाजप आहे. उद्या पुन्हा सत्ता बदलेलही. पण सामान्य माणसाच्या प्रश्नांचे काय? तरुणांच्या हाताला रोजगार, शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव, कुटुंबाच्या खर्चाला परवडणाऱ्या किमती, शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा, सुरक्षितता आणि पारदर्शक प्रशासन या प्रश्नांना कोण प्राधान्य देणार? निवडणुकीच्या आधी जनतेच्या प्रश्नांवर वातावरण तापते; निवडणुकीनंतर मात्र राजकीय पक्षांच्या प्राधान्यक्रमात बदल होतो. हे सत्य आहे. आज भाजपने काँग्रेसला विचारावे की तुमचे आरोप किती खरे आहेत, तर काँग्रेसनेही भाजपला विचारावे की तुमच्या आश्वासनांचे काय झाले. मात्र, जनतेने या दोन्ही पक्षांना एकच प्रश्न विचारला पाहिजे तुमच्या वाद्यांचे काय झाले? २०११ मध्ये भाजपने केलेले राजकारण योग्य होते, असे मानणाऱ्यांनी आज काँग्रेसच्या प्रत्येक भूमिकेला केवळ विरोधकांचे राजकारण म्हणून नाकारू नये. राजकारणात पक्षनिष्ठा असू शकते; पण सत्याची व्याख्या पक्षनिष्ठेनुसार बदलता कामा नये. भाजपने केलेला आरोप पुराव्यांच्या कसोटीवर तपासला पाहिजे आणि काँग्रेसने केलेला आरोपही त्याच कसोटीवर तपासला पाहिजे. भाजपने केलेले आंदोलन लोकशाहीचा अधिकार असेल, तर काँग्रेसचे आंदोलनही तोच अधिकार आहे. म्हणूनच प्रश्न भाजप बरोबर की काँग्रेस बरोबर, एवढाच नाही. प्रश्न असा आहे की, २०११ मध्ये भाजपसाठी योग्य असलेली राजकीय रणनीती २०२६ मध्ये काँग्रेसने वापरली, तर ती अचानक अयोग्य कशी ठरते? राजकारणात पक्ष बदलतात, सत्ताधारी बदलतात, घोषणांचे शब्द बदलतात; पण जनतेच्या प्रश्नांची उत्तरे देण्याची जबाबदारी बदलत नाही. आणि शेवटी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे राजकीय पक्षांची लढाई सत्तेसाठी असते, तर सामान्य माणसाची लढाई जगण्यासाठी! २०११ असो वा २०२६- सत्ताधारी कोण आणि विरोधक कोण, यापेक्षा जनतेचे प्रश्न खरे आहेत का आणि त्यांची उत्तरे दिली जात आहेत का, हेच महत्त्वाचे. बाकी सत्तेचा खेळ सुरूच राहणार; त्यात सामान्य माणूस पुन्हा भरडला जाऊ नये, एवढीच अपेक्षा!

संजय नामदेव आहिरे
उपसंपादक, दैनिक युवावार्ता

संपादकीय...

जबाबदारी निश्चित झाल्याशिवाय भ्रष्टाचार थांबणार कसा?

लोकशाही व्यवस्थेत शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यावर जनतेच्या हिताचे रक्षण करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी असते. जनतेच्या कररूपाने जमा होणाऱ्या पैशातून विकासकामे केली जातात, विविध योजना राबवल्या जातात आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. मात्र, या व्यवस्थेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाचा अभाव निर्माण झाला की भ्रष्टाचाराला मोकळे रान मिळते. आज भ्रष्टाचार हा केवळ आर्थिक गैरव्यवहारापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो सामान्य माणसाच्या जगण्यावर परिणाम करणारी गंभीर समस्या बनला आहे. प्रश्न असा आहे की, भ्रष्टाचाराविरोधात कितीही कठोर घोषणा झाल्या, चौकशांचे आदेश निघाले आणि कारवाईचे इशारे दिले, तरी प्रत्यक्षात भ्रष्टाचार कमी का होत नाही? याचे महत्त्वाचे कारण म्हणजे जबाबदारी निश्चित करण्याची इच्छाशक्ती आणि प्रभावी यंत्रणेचा अभाव. एखाद्या गावात पाणीपुरवठा योजनेसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर होतो. कामाचे भूमिपूजन होते, उद्घाटन होते, फलक लागतात आणि सरकारी कागदपत्रांमध्ये काम पूर्ण झाल्याची नोंदही होते. मात्र, प्रत्यक्षात गावातील नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नाही. अशा वेळी जबाबदार कोण? निधी मंजूर करणारे अधिकारी, कामाचे नियोजन करणारे अभियंते, काम करणारे ठेकेदार की कामाची गुणवत्ता तपासण्याची जबाबदारी असलेली यंत्रणा? प्रत्येक जण आपली जबाबदारी दुसऱ्यावर ढकलत राहिला, तर जनतेच्या पैशाचे नुकसान भरून काढणार कोण? जलजीवन मिशनसारख्या योजनांमधील रखडलेली कामे या प्रश्नाचे गांभीर्य अधोरेखित करतात. विकासकामांमध्ये निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जाते, रस्ते काही महिन्यांत उखडतात, पाणीपुरवठ्याच्या योजना सुरू होण्याआधीच बंद पडतात आणि इमारतींच्या बांधकामात त्रुटी आढळतात. त्यानंतर चौकशी समिती नेमली जाते. समिती अहवाल सादर करते. काही दिवस चर्चा होते आणि पुन्हा सर्व काही शांत होते. अनेक प्रकरणांमध्ये चौकशीचा निष्कर्ष जनतेसमोर येत नाही. दोषींवर कारवाई झाली की नाही, नुकसान भरून काढले की नाही, याची माहितीही नागरिकांना मिळत नाही. त्यामुळे चौकशी ही केवळ वेळकाढूपणाची प्रक्रिया बनू नये, यासाठी तिच्या निष्कर्षांवर निश्चित कालमर्यादेत कार्यवाही होणे आवश्यक आहे. भ्रष्टाचार रोखण्यासाठी केवळ कायदे आणि नियम पुरेसे नाहीत. त्या नियमांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा प्रामाणिक आणि सक्षम असणे गरजेचे आहे. सरकारी कामांमध्ये मंजूर अंदाजपत्रक, प्रत्यक्ष खर्च, कामाची गुणवत्ता आणि पूर्णत्वाचा अहवाल यांची सार्वजनिक माहिती उपलब्ध असली पाहिजे. कोणत्या कामासाठी किती निधी मंजूर झाला, किती खर्च झाला, ठेकेदार कोण आहे आणि कामाची सद्यस्थिती काय आहे, हे नागरिकांना सहज समजले पाहिजे. ग्रामसभा, नगरपरिषद आणि जिल्हा परिषद स्तरावर नागरिकांना या माहितीचा आढावा घेण्याची संधी मिळाली पाहिजे. माहितीचा अधिकार हा केवळ कागदावरील कायदा न राहता लोकांच्या हातातील प्रभावी साधन बनला पाहिजे. यामध्ये लोकप्रतिनिधींची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. निवडणुकीच्या काळात विकासकामांची आश्वासने दिली जातात. निधी आणल्याचा दावा केला जातो. मात्र, त्या निधीतून झालेल्या कामांची गुणवत्ता तपासण्याची जबाबदारीही लोकप्रतिनिधींनी स्वीकारली पाहिजे. केवळ उद्घाटनाच्या फलकावर नाव झळकणे म्हणजे विकास नव्हे. जनतेच्या पैशातून झालेल्या कामाचा दर्जा आणि त्याचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांना मिळतो की नाही, याची खात्री करणे हे खरे लोकप्रतिनिधित्व आहे. भ्रष्टाचाराविरोधातील लढ्यात प्रामाणिक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे संरक्षण करणेही आवश्यक आहे. गैरव्यवहार उघड करणाऱ्या व्यक्तींना अनेकदा दबाव, बदली किंवा अन्य अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे तक्रारदार आणि माहिती उघड करणाऱ्यांना संरक्षण मिळाले पाहिजे.

वाहन विकणे आहे

संस्थेचे खालील वाहन योग्य किंमतीत विकणे आहे.

Sr. No	Vehicle Reg. No and Make	Date of Purchase
1	Motor cycle - Bajaj Discover DTSI 100 CC - MH-16-AF-1963	26-10-2010
2	Motor cycle - Bajaj Discover DTSI 100 CC - MH 16 AF 1962	26-10-2010

1. वाहन पाहण्यासाठी खालील फोन नंबरवर संपर्क साधावा.
2. निविदा बंद पाकिटात दोन दिवसाच्या आत संस्थेच्या कार्यालयात सादर कराव्यात.
3. निविदा रद्द करण्याचा अधिकार संस्थेस राहील.

वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट (वॉटर)
गिताई बिल्डिंग, मर्चंट बँक समोर, नविन नगर रोड, संगमनेर
दूरध्वनी क्र. ०२४२२- २२५८०५

तीन तासांची शस्त्रक्रिया; पोटातून काढली १५ किलोची गाठ!

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल आणि वैद्यकीय महाविद्यालय, अहिल्यानगर येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने एका ७२ वर्षीय महिलेच्या पोटातून तब्बल १५ किलो वजनाची अंडाशयाची मोठी गाठ शस्त्रक्रियेद्वारे यशस्वीरीत्या काढून वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. शनिवार, दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात आलेली ही आव्हानात्मक शस्त्रक्रिया सुमारे तीन तास चालली. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती अतिशय चांगली असून तिच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाली आहे.

सदर महिला रुग्णाच्या पोटामध्ये मोठ्या आकाराची गाठ तयार झाली होती. या गाठीमुळे पोटावर मोठा ताण निर्माण होऊन रुग्णाला श्वास घेण्यास, लघवी करण्यास तसेच शौचास जाण्यास त्रास होत होता. गाठीचा आकार वाढल्यामुळे रुग्णाच्या दैनंदिन जीवनावरही परिणाम होत होता. तपासणीनंतर ही अंडाशयाची गाठ असल्याचे निदर्शनास आले. गाठीचा प्रचंड आकार आणि तिची इतर अवयवांशी झालेली चिकटण ही शस्त्रक्रियेतील प्रमुख आव्हाने होती.

या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेमध्ये डॉ. अद्वैत वैद्य (कर्करोग शस्त्रक्रिया तज्ज्ञ) आणि डॉ. दीपक गाडेकर (मूत्रविकार तज्ञ) यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. शस्त्रक्रियेदरम्यान गाठ आजूबाजूच्या इतर अवयवांना चिकटलेली असल्याने विशेष काळजी आणि कौशल्याची आवश्यकता होती. रुग्णाच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत डॉक्टरांच्या पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने शस्त्रक्रिया पूर्ण केली आणि सुमारे १५ किलो वजनाची गाठ यशस्वीरीत्या काढण्यात आली.

वृद्ध वयातील रुग्ण, गाठीचा मोठा आकार आणि इतर अवयवांशी असलेली चिकटण या सर्व बाबी लक्षात घेता ही शस्त्रक्रिया वैद्यकीयदृष्ट्या आव्हानात्मक होती. मात्र, तज्ज्ञ डॉक्टरांचे कौशल्य, योग्य उपचारनियोजन आणि रुग्णालयातील वैद्यकीय सुविधांच्या साहाय्याने ही शस्त्रक्रिया यशस्वी झाली. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती अतिशय चांगली असल्याने रुग्णालयातील डॉक्टर व उपचार पथकाने समाधान व्यक्त केले.

माननीय नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील अध्यक्ष डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पुढाकाराने रुग्णालयात सुपर स्पेशलिटीच्या सोई सुविधा गोरगरिबांसाठी उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नामुळे हे शक्य झाले आहे. आधुनिक वैद्यकीय उपचार आणि गुणवत्तापूर्ण रुग्णसेवा यांना नेहमीच प्राधान्य दिले जाते. अशा प्रकारच्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडणे हे रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांची कार्यक्षमता, वैद्यकीय अनुभव आणि रुग्णकेंद्रित उपचारपद्धतीचे द्योतक आहे.

अरविंद गाडेकरांच्या व्यंगचित्रांचा 'हास्यरेषा' ग्रंथात समावेश!

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह, शिवाजीपार्क, दादर येथे देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य), उद्धव ठाकरे (माजी मुख्यमंत्री, महा. राज्य), राज ठाकरे (अध्यक्ष, मनसे),आशिष शेलार (सांस्कृतिक कार्यमंत्री) हे मान्यवर नुकतेच एका व्यासपीठावर उपस्थित होते. निमित्त होते प्रसिद्ध व्यंगचित्रकार प्रशांत कुलकर्णी यांनी संपादित केलेल्या 'हास्यरेषा' या ग्रंथाचे प्रकाशन.

गेल्या शंभर वर्षातील मराठीतील प्रख्यात व्यंगचित्रकारांचा परिचय आणि त्यांची निवडक व्यंगचित्र असलेला भारतीय भाषेतील एकमेव अशा या ग्रंथात संगमनेरचे प्रसिद्ध व्यंगचित्रकार अरविंद गाडेकर यांचाही परिचय आणि निवडक व्यंगचित्रांचा समावेश आहे. त्यांचा या ग्रंथात समावेश झाल्याबद्दल सर्वच स्थरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. गाडेकरांनी व्यंगचित्राच्या माध्यमातून संगमनेरचे नावं देशपातळीवर नेले असून या कलेचा प्रसार केला आहे.

निळवंडे शाळेत 'मिशन आपुलकी'तून शैक्षणिक दत्तक पालक योजनेचा शुभारंभ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी आधार मिळावा या उद्देशाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या प्रेरणेने निळवंडे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 'मिशन आपुलकी' अंतर्गत शैक्षणिक दत्तक पालक योजनेचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी निळवंडेचे भूमिपुत्र तथा सेफ्टी सारथी प्रा. लि., पुणेचे संस्थापक अध्यक्ष सागर कुलकर्णी आणि व्यवस्थापकीय संचालिका मानसी कुलकर्णी यांनी शाळेच्या कुसुमाग्रज वाचनालयासाठी ३० हजार रुपये किमतीची १५२ पुस्तके भेट दिली. तसेच पाच गुणवंत व आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना बारावीपर्यंत प्रतिवर्ष पाच हजार रुपये शैक्षणिक मदत देण्याची घोषणा केली. यामध्ये पाचवीतील अक्षरा शाम पवार, पूनम गणेश आहेर, यश नानासाहेब पवार, सहावीतील अमृता सागर उकिर्डे आणि सातवीतील रितू महेश बढे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

यावेळी बोलताना सागर कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शिक्षणाच्या जोरावर आयुष्यात यशस्वी व्हावे, असे आवाहन केले. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, मुकेश अंबानी आणि एलन मस्क यांच्या जीवनातील उदाहरणे देत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच ह. भ. प. शशिकला पवार होत्या. उपसरपंच भाऊसाहेब आहेर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय आहेर, मुख्याध्यापक रमेश निघुते, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष शिवाजी आहेर, ग्राम महसूल अधिकारी शशिकांत सोनवणे यांच्यासह ग्रामस्थ, पालक व शिक्षक उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक रमेश निघुते यांनी केले. सूत्रसंचालन अनिल कडलग यांनी केले, तर आभार संजय एरंडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. शाळेत १५२ नवीन पुस्तकांची भर पडल्याने विद्यार्थ्यांच्या वाचनाची आवड वाढण्यास मदत होईल. उपसरपंच भाऊसाहेब आहेर यांनीही या उपक्रमाचे कौतुक करून वाचनसंस्कृती आणि शिक्षणाला बळ देणारा हा उपक्रम शाळेसाठी अभिमानास्पद असल्याचे सांगितले.

तहसिल कार्यालय, संगमनेर
क्रं.कावि/दंडाधि/वारस/२०२६
दिनांक – /१०/२०२६

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

कै. बाळासाहेब राजारामसिंग राजपुत, रा. संगमनेर, ता. संगमनेर हे दिनांक ०८/०६/२०२६ रोजी मौजे संगमनेर, ता. संगमनेर या ठिकाणी मयत झालेले असुन ते पाटबंधारे विभाग संगमनेर ता. संगमनेर, जि. अ. नगर येथे शिपाई या पदावर वेतनधारक होते. त्यांना वारस खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र.	वारसांची नावे	वय	मयताशी नाते
१.	संगिता राजेंदसिंग परदेशी	५६ वर्ष	मुलगी
२.	सुजाता नरेंदसिंग परदेशी	५४ वर्ष	मुलगी
३.	ज्योती महेंदसिंग परदेशी	५० वर्ष	मुलगी
४.	इंदायणी शामसिंग परदेशी	४८ वर्ष	मुलगी
५.	गणेश बाळासाहेब राजपुत	४५ वर्ष	मुलगा
६.	वर्षा निरजसिंग परदेशी	४३ वर्ष	मुलगा

वरील प्रमाणे मयतास वारस असून या व्यतिरिक्त मयतास दुसरे कोणीही वारस नाहीत. या वारसपत्राबाबत कोणास काही हरकत तक्रार घ्यावयाची असल्यास ती आज पासुन कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवसांचे आत या कार्यालयास सादर करावी. तक्रार न आल्यास **श्रीमती. ज्योती महेंदसिंग परदेशी रा. संगमनेर, ता.संगमनेर जि.अहिल्यानगर** यांना कुटूंब प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस यास **श्रीमती. ज्योती महेंदसिंग परदेशी रा. संगमनेर, ता.संगमनेर जि.अहिल्यानगर** यांचे अर्जावरुन दिली असे.

तहसिलदार, संगमनेर

प्रो. रु.
रजि. नं.

ॲड. बी. आर. राऊत
फौजदारी न्यायालय कोर्ट नं.२
संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर

जाहीर नोटीस
मे. ज्युडीशिअल मॅजीस्ट्रेट साहेब वर्ग १ संगमेर
क्रि. चौ.अर्ज नं. ५९२/२०२६ यांचे कोर्टात

रशीद उस्मान शेख ---- अर्जदार
विरुध्द
ग्रामसेवक मौजे जांभूळवाडी ---- सा. वाले

अर्जदार हा वरील ठिकाणची कायमस्वरुपी स्थायिक रहिवाशी असुन आहे. अर्जदाराचा मुलगा नामे रेहान रशीद शेख याचा जन्म दि. ११.०७.१९९१ रोजी मौजे जांभूळवाडी ता संगमनेर जि अ नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे. अर्जदार याचे जन्माची नोंद मौजे जांभूळबाडी ता संगमनेर जि अनगर येथे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आढळत नाही. त्याप्रमाणे अर्जदार याने मे. फौजदारी न्यायालय, कोर्ट नं. २ यांचे कोर्टात क्रि.चौ.अ.नं.५९२/२०२६ हा अर्ज अर्जदार याने दि११.०७.१९९१ रोजीचे जन्माची नोंद होणेकामी दाखल केला आहे.

सबब सदर नोटीसने कळविण्यात येते की, अर्जदार नामे रेहान रशीद शेख याचा जन्म दि. ११.०७.१९९१ रोजी मौजे जांभूळवाडी ता संगमनेर जि अ.नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे. यासंदर्भात कोणाची काही हरकत असल्यास तशी लेखी अगर तोंडी हरकत सदर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत अथवा ता.१८.११.२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. मे. न्यायालयात स्वतः हजर राहुन अथवा वकिलांमार्फत नोंदवावी, अन्यथा त्यांच्या जन्माच्या नोंदीच्या संदर्भात कोणतीही हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश केला जाईल.

सही
तयार करणार

शिक्का

हुकूमावरून
सह. अधिक्षक दिवाणी व फौजदारी
न्यायलय कोर्ट नं. २ संगमनेर

प्रो. रु.
रजि. नं.

ॲड. बी. आर. राऊत
फौजदारी न्यायालय कोर्ट नं.२
संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर

जाहीर नोटीस
मे. ज्युडीशिअल मॅजीस्ट्रेट साहेब वर्ग १ संगमेर
क्रि. चौ.अर्ज नं. ५८२/२०२६ यांचे कोर्टात

अन्वर बाबुलाल शेख ---- अर्जदार
विरुध्द
मा. मुख्याधिकारी तथा निबंधक नगरपरिषद, संगमनेर ---- सा. वाले

अर्जदार हा वरील ठिकाणची कायमस्वरूपी स्थायिक रहिवाशी असुन आहे. अर्जदार याचा जन्म दि. ०१/०६/१९६६ रोजी पुणे रोड, बौध्द मंदिरासमोर, राजवाडा, संगमनेर, ता. संगमनेर, जि.अ. नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे.. अर्जदार याचे जन्माची नोंद संगमनेर नगर परिषद संगमनेर, ता. संगमनेर येथे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आढळत नाही. त्याप्रमाणे अर्जदार याने मे. फौजदारी न्यायालय, कोर्ट नं. २ यांचे कोर्टात क्रि.चौ.अ.नं.५८२/२०२६ हा अर्ज अर्जदार याने दि. ०१/०६/१९६६ रोजीचे जन्माची नोंद होणेकामी दाखल केला आहे.

सबब सदर नोटीसने कळविण्यात येते की, अर्जदार याचा जन्म दि. ०१/०६/१९६६ रोजी पुणे रोड, बौध्द मंदिरासमोर राजवाडा. संगमनेर, ता. संगमनेर, जि.अ. नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे. यासंदर्भात कोणाची काही हरकत असल्यास तशी लेखी अगर तोंडी हरकत सदर नोटीस प्रसिध्दींचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत अथवा ता. २६/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. मे. न्यायालयात स्वतः हजर राहुन अथवा वकिलांमार्फत नोंदवावी, अन्यथा त्यांच्या जन्माच्या नोंदीच्या संदर्भात कोणतीही हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश केला जाईल.

सही
तयार करणार

शिक्का

हुकूमावरून
सह. अधिक्षक दिवाणी व फौजदारी
न्यायलय कोर्ट नं. २ संगमनेर

प्रो. रु.
रजि. नं.

ॲड. बी. आर. राऊत
फौजदारी न्यायालय कोर्ट नं.२
संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर

जाहीर नोटीस
मे. ज्युडीशिअल मॅजीस्ट्रेट साहेब वर्ग १ संगमेर
क्रि. चौ.अर्ज नं. ५८७/२०२६ यांचे कोर्टात

गोपीनाथ आवजी मेंगाळ ---- अर्जदार
विरुध्द
ग्रामसेवक मौजे सावरचोळ ---- सा. वाले

अर्जदार हा वरील ठिकाणची कायमस्वरुपी स्थायिक रहिवाशी असुन आहे. अर्जदार याची मुलगी समृद्धी गोपीनाथ मेगाळ हिचा जन्म दि. ०२.१०.२०१९ रोजी मौजे मेंगाळवाडी ता संगमनेर जि अ.नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे.. अर्जदार याचे जन्माची नोंद आश्वी खु, ता. संगमनेर येथे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आढळत नाही. त्याप्रमाणे अर्जदार याने मे. फौजदारी न्यायालय, कोर्ट नं. २ यांचे कोर्टात क्रि.चौ.अ.नं.५८७/२०२६ हा अर्ज अर्जदार याने दि. ०२.१०.२०१९ रोजीचे जन्माची नोंद होणेकामी दाखल केला आहे.

सबब सदर नोटीसने कळविण्यात येते की, अर्जदार याच्या मुलीचा जन्म दि. ०२.१०.२०१९ रोजी मौजे मेंगाळवाडी ता संगमनेर जि अ नगर येथे रहाते घरी झालेला असून आहे, यासंदर्भात कोणाची काही हरकत असल्यास तशी लेखी अगर तोडी हरकत सदर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत अथवा ता. १९/११/२०२६ रोजी सकाळी १०.३० वा. मे. न्यायालयात स्वतः हजर राहुन अथवा वकिलांमार्फत नोंदवावी, अन्यथा त्यांच्या जन्माच्या नोंदीच्या संदर्भात कोणतीही हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश केला जाईल.

सही
तयार करणार

शिक्का

हुकूमावरून
सह. अधिक्षक दिवाणी व फौजदारी
न्यायलय कोर्ट नं. २ संगमनेर

पाहिजेत

गरजू व अनुभवी
साईट इंजिनीअर,
सुपरवायझर व
ऑफिस असीस्टंट पाहिजेत
- संपर्क -
चिंतामणी डेव्हलपर्स
7741057560

पाहिजेत

ड्रायव्हर - २ जागा
आकर्षक वेतन
अर्जासह समक्ष भेटणे
श्री बलदेव कन्स्ट्रक्शन
इनसाईड कांकरेज कॉर्नर
गणेशनगर, संगमनेर
- संपर्क -
8308015324

Yuvavarta.in
VISIT
INSTAGRAM
daily_yuvavarta
VISIT
Facebook
Daily yuvavarta

रिक्त पदे भरणे आहे

MYCITYHUB GLOBAL PRIVATE LIMITED, sangamner
- बिझनेस एक्झिक्युटिव्ह – ४
- कार्यालयीन प्रशासक – १
- आयटी प्रोफेशनल – १
- संगमनेर, अकोले तालुका प्रतिनिधी प्रत्येकी - १

पात्रता १२ वी किंवा पदवीधर,
संगणक ज्ञानवेतन व इतर सुविधा
२० ते २५ हजार+ इन्सेंटिव्ह

Contract -
mycityhubglobal@gmail.comMob- 9970473161

पाहिजेत

मार्केटिंग वाहतूक गाड्यांची आवश्यक

आमच्या प्रतिदिन दूध .पॅकिंग व दुग्धजन्य पदार्थ करिता संगमनेर तालुका व आसपासच्या परिसरा मध्ये मार्केटिंग कामासाठी खालील प्रकारच्या इन्सुलेटेड गाड्यांची आवश्यकता आहे. साधारण ५०० किलो पर्यंत माल असेल

१.क्रं	गाडीचा प्रकार
१	छोटा हत्ती
२	टाटा झिप
३	महिंद्रा जीतो
४	मारुति सुजुकी सुपर कॅरि

सदर गाडी मालकांनी ऑफिस मध्ये गाडीच्या कागदपत्रासह समक्ष भेटणे. कंपनी कामकाज वेळेत रविवार सोडून. कामासंबधी सर्व अटी व शर्ती कंपनी नियमप्रमाणे राहतील. या संदर्भात आवश्यक ती माहिती कंपनी कार्यलयात मिळेल.
ऑफिस– एस.आर.थोरात मिल्क प्रोडक्टस प्रा. लि. राजापूर रोड. संगमनेर
मो.९८६०१००९३६/९३७

फ्लॅट विकणे आहे!

फ्लोरा टाउनशिप, घुलेवाडी
निशिगंध अपार्टमेंटमध्ये पहिल्या मजल्यावरील तीन बाल्कनीचा प्रशस्त फ्लॅट विकणे आहे.
क्षेत्रफळ : १०२० चौ. फूट
कार पार्किंगची सुविधा
अपेक्षित किंमत : २७ लाख रुपये,
किंमत वाटाघाटीनुसार ठरविण्यात येईल.
- संपर्क -
8379064040

कामगार भरती

अकाउंटंट - 01 (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- 05 (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- 01
ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स
अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

साडेपाच लाख शेतकऱ्यांच्या खात्यात १०९ कोटी रुपयांचा सन्मान निधी जमा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा न २४ वा हप्ता गुरुवारी (३० । ऑक्टोबर) जिल्ह्यातील ५ लाख न ४४ हजार ७६२ शेतकऱ्यांच्या बँक न खात्यांत जमा झाला. प्रत्येकी दोन हजार रुपयांप्रमाणे एकूण १०८ न कोटी ९५ लाख २४ हजार रुपयांचा निधी शेतकऱ्यांना मिळाला आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळत असून, योजनेची सातत्यपूर्ण अंमलबजावणी हे केंद्र सरकारचे यश असल्याचे प्रतिपादन जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेली ही योजना महत्त्वपूर्ण ठरली आहे. वर्षाला सहा हजार रुपये तीन हप्त्यांत थेट बँक खात्यात जमा होत असल्याने अल्पभूधारक शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळतो. यापूर्वीचे २३ हप्तेही केंद्र सरकारच्या माध्यमातून नियमितपणे जमा झाले असून, योजनेबाबत शेतकऱ्यांमध्ये समाधान असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. सध्या पेरणीची कामे सुरू असताना मिळालेला हा निधी शेतकऱ्यांना उपयोगी ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

तालुकानिहाय लाभार्थ्यांमध्ये संगमनेर तालुका आघाडीवर असून, तेथील ५८ हजार ५७६ शेतकऱ्यांना ११ कोटी ७१ लाख रुपये मिळाले. नेवासा तालुक्यातील ५३ हजार ५३१ शेतकऱ्यांच्या खात्यात १० कोटी ७० लाख, श्रीगोंद्यातील ५० हजार ४४७ शेतकऱ्यांना १० कोटी ८९ लाख, तर पारनेरमधील ५० हजार शेतकऱ्यांना १० कोटी रुपये जमा झाले. कर्जत तालुक्यात ४३ हजार ५३९ शेतकऱ्यांना ८ कोटी ७० लाख, शेवगावमध्ये ४२ हजार ३८१ शेतकऱ्यांना ८ कोटी ४७ लाख, राहुरीत ३८ हजार १९५ शेतकऱ्यांना ७ कोटी ६३ लाख, तर अकोलेत ३४ हजार ५०८ शेतकऱ्यांना ६ कोटी ९० लाख रुपये मिळाले. उर्वरित तालुक्यांतील शेतकऱ्यांच्याही खात्यांत निधी वर्ग करण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या योजनांची अंमलबजावणी सातत्याने सुरू असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना ५ हजार, कुंभमेळ्यासाठी ३५ हजार कोटी

आ. रोहित पवारांचा सरकारवर हल्लाबोल, निधीचा हिशोब मागीतला

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील भीषण दुष्काळी परिस्थिती आणि नाशिकमध्ये आगामी कुंभमेळयासाठी होणाऱ्या खर्चावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी राज्य सरकारवर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. एकीकडे दुष्काळाच्या आगीत होरपळणाऱ्या शेतकऱ्यांच्या हातावर ५ हजार रुपये टेकवून सरकार त्यांची थट्टा करत आहे, तर दुसरीकडे नाशिक कुंभमेळ्याच्या नावाखाली ३५ हजार कोटी रुपये खर्चाचा हिशोब द्यायला सरकार तयार नाही, असा घणाघात रोहित पवार यांनी केला आहे. कुंभमेळ्याच्या कामातील माहिती अधिकारात (ठढख) दडवली जात असल्याचा आरोप करत पवारांनी आज थेट वृत्तपत्रात 'जाहीर नोटीस' प्रसिद्ध करून सरकारविरोधात कायदेशीर लढाईचे रणशिंग फुंकले आहे.

रोहित पवार यांनी आपल्या सोशल मीडिया खात्यावर या संदर्भातील सविस्तर पोस्ट करून सरकारला थेट आव्हान दिले आहे. राज्यातील शेतकरी दुष्काळाने त्रस्त असताना त्यांना मिळणाऱ्या मदतीवर पवारांनी बोट ठेवले. अन्नदाता शेतकरी भीषण दुष्काळाच्या आगीत होरपळत असताना, हे सरकार त्याच्या हातावर ५ हजार रुपये टिकल्या टेकून त्याची थट्टा करत आहे. मात्र, दुसऱ्या बाजूला नाशिक कुंभमेळयाच्या नावाखाली केल्या जाणाऱ्या ३५,००० कोटी रुपये खर्चाचा कोणताही हिशोब द्यायला सरकार

तयार नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

कुंभमेळ्याच्या निधीतून होणाऱ्या कामांमध्ये प्रचंड अनियमितता, निकृष्ट दर्जा आणि भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप होत असल्याचा दावा रोहित पवारांनी केला आहे. यातील काही माहिती आपल्याकडे असून, अधिकृत पातळीवर सरकारकडून काय माहिती मिळते हे पाहण्यासाठी आपण विविध शासकीय विभागांकडे पत्रव्यवहार केला आणि माहिती अधिकारात (ठढख) अर्ज दिले, मात्र जाणीवपूर्वक ही माहिती दडवली जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. रोहित पवार म्हणाले, जनतेच्या घामाच्या पैशावर डल्ला मारणारे हे महाभाग कोण आहेत आणि त्यांना कोण पाठीशी घालतंय? सरकार माहिती का लपवतंय, हे आम्हाला पाहायचंच आहे. माहिती दिली नाही म्हणून आपण शांत बसणार नसल्याचा इशारा देत पवारांनी पुढील पाऊल उचलले आहे. आज थेट वृत्तपत्रात 'जाहीर नोटीस' प्रसिद्ध करून कायदेशीर लढाईचं रणशिंग फुंकलं आहे. सर्व कायदेशीर हत्यारांचा वापर करून आम्ही ही लपवलेली माहिती बाहेर काढू.

पान २ वरून संगमनेरमध्ये गोवंश...

संगमनेर - संगमनेर शहरातील अवैध गोवंश कत्तलीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेने कादरीनगर परिसरात धडक कारवाई करत गोवंशीय जनावरांची कत्तल सुरू असलेल्या ठिकाणावर छापा टाकला. या कारवाईत तब्बल १ हजार ९०० किलो गोमांस जप्त करण्यात आले असून, नऊ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. यामध्ये एका विधिसंघर्षित बालकाचाही समावेश आहे. दरम्यान, या कथित कत्तलखान्याचे सूत्रधार असल्याचा संशय असलेले दोन मुख्य आरोपी पोलिसांना गुंगारा देऊन फरार झाले आहेत. पोलिसांनी छोटा हत्ती वाहन, कुऱ्हाडी, सुरे, वजनकाटा आदी साहित्यांसह एकूण ९ लाख ७३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंद्यांची माहिती घेत असताना कादरीनगर परिसरातील गौसो रजा मस्जिदजवळील गल्ली क्रमांक २ व ३ येथे गोवंशीय जनावरांची कत्तल सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली. सोमू उर्फ आतीक रफीक कुरेशी आणि अनस सरवर कुरेशी हे काही साथीदारांच्या मदतीने गोवंशीय जनावरांची कत्तल करून गोमांस विक्री करत असल्याची माहिती पथकाला मिळाली. मिळालेल्या माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी पंचांसमक्ष संबंधित ठिकाणी धाव घेतली. त्यावेळी काही इसम प्रत्यक्ष गोवंशीय जनावरांची कत्तल करत असल्याचे आढळून आले.

साय डोंगर परिसरातील जंगलतोड तात्काळ थांबवा

टोरंट पॉवरच्या प्रस्तावित जलविद्युत प्रकल्पाला K.A. ग्रुपचा विरोध

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील सायडोंगर परिसरात टोरंट पॉवर कंपनीच्या प्रस्तावित जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्पावरून पर्यावरणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या प्रकल्पामुळे नैसर्गिक जंगल, वन्यजीवांचे अधिवास, जैवविविधता तसेच आदिवासी समाजाच्या जमीन व वनहक्कांवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर अकोले तालुक्यातील क्रांतिकारी आदिवासी युवा प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी सायडोंगर परिसराला भेट देऊन पाहणी केली.परिसरातील जंगलतोड थांबविण्याची मागणी केली.

सायडोंगर परिसरातील जंगल हे पर्यावरणीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे असून या वनक्षेत्रात विविध प्रकारचे वन्यजीव, पक्षी, औषधी वनस्पती आणि दुर्मीळ वृक्ष आढळतात. प्रस्तावित प्रकल्पाच्या कामामुळे जंगलक्षेत्रावर परिणाम झाल्यास शेकरू, बिबट्या यांसह अन्य वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासाला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच वनक्षेत्र कमी झाल्यास डोंगरउतारावरील मातीची धूप, जलस्रोतांमध्ये बदल आणि पर्यावरणाचा समतोल बिघडण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

जंगल हे केवळ झाडांचे समूह नसून आदिवासी समाजाच्या जीवनाचा, संस्कृतीचा आणि उपजीविकेचा अविभाज्य भाग आहे. पिढ्यान्पिढ्या आदिवासी

समाज जंगलावर अवलंबून असून त्यांच्या जीवनशैलीशी वनसंपत्तीचे अतूट नाते आहे. त्यामुळे विकासाच्या नावाखाली नैसर्गिक साधनसंपत्तीचा विनाश करून स्थानिक नागरिकांच्या हक्कांकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही, अशी भूमिका के.ए. ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली.

प्रस्तावित प्रकल्पामुळे स्थानिक नागरिकांच्या जमिनी, वनहक्क आणि पर्यावरणावर नेमका काय परिणाम होणार आहे, याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. कोणतेही काम करण्यापूर्वी पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास, वनविभागाच्या आवश्यक परवानग्या आणि संबंधित कायदेशीर प्रक्रियांचे पालन झाले आहे की नाही, याची प्रशासनाने खातरजमा करावी, अशी मागणीही संघटनेच्या वतीने करण्यात आली. सायडोंगर परिसरातील जंगलतोडीच्या प्रश्नाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे. पर्यावरणीय परिणामांचा सखोल अभ्यास, वन्यजीवांच्या अधिवासाचे संरक्षण आणि आदिवासींच्या कायदेशीर हक्कांची खात्री होईपर्यंत संबंधित कामकाजाची चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करावी.

या पाहणी दौऱ्यात के.ए. ग्रुपचे अध्यक्ष राहुल वळे, उपाध्यक्ष वैभव गोंदके, सल्लागार विशाल गोंदके, संपर्कप्रमुख विजय पिचड, विशाल इरणक, प्रवीण कोंडार, महेश गवारी, चंदर पारधी यांच्यासह संघटनेचे अन्य पदाधिकारी सहभागी झाले होते. जंगल वाचले तरच निसर्ग वाचेल आणि निसर्ग वाचला तरच आपले भविष्य सुरक्षित राहील. विकासाला आमचा विरोध नाही; मात्र निसर्गाचा विनाश करून होणारा विकास आम्हाला मान्य नाही अशी ठाम भूमिका क्रांतिकारी आदिवासी युवा प्रतिष्ठान अकोले तालुका यांच्यावतीने व्यक्त करण्यात आली.

दिनविशेष

२००५: योगेशकुमार सभरवाल — यांनी भारताचे ३६वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
२०००: छत्तीसगड राज्य — हे अधिकृतपणे भारताचे २६ वे राज्य बनले.
२०००: संयुक्त राष्ट्र — सर्बिया आणि मॉन्टेनेग्रो प्रजासत्ताक देशांचा संयुक्त राष्ट्रात प्रवेश.
१९९३: युरोपियन युनियन — मास्ट्रिच करारामुळे औपचारिकपणे स्थापना झाली.
१९८४: शीखविरोधी दंगली — भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांची ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी त्यांच्या दोन शीख अंगरक्षकांनी हत्या केल्यानंतर शीखविरोधी दंगली उसळल्या.
१९८२: होंडा — अमेरिकेत कार तयार करणारी पहिली आशियाई ऑटोमोबाईल कंपनी बनली.
१९८१: अँटिग्वा आणि बारबुडा — देशांना युनायटेड किंगडमपासून स्वातंत्र्य मिळाले.

जन्म

१९८७: इलियाना डिक्रूझ — भारतीय-पोर्तुगीज अभिनेत्री आणि मॉडेल
१९७४: वी. वी. एस. लक्ष्मण — भारतीय क्रिकेटपटू — पद्मश्री
१९७३: ऐश्वर्या राय — भारतीय अभिनेत्री आणि मिस वर्ल्ड — पद्मश्री, मिस वर्ल्ड (१९९४)
१९६३: नीता अंबानी — भारतीय उद्योजीका
१९६०: टीम कूक — ऍपल इन्कचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१९५३: जॅन डेव्हिस — अमेरिकन अंतराळवीर, पती मार्क ली सोबत अंतराळात जाणारे पहिले विवाहित जोडी
१९४५: नरेंद्र दाभोलकर — महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष — पद्मश्री (निधन: २० ऑगस्ट २०१३)
१९४०: रमेश चंद्र लाहोटी — भारताचे ३५वे सरन्यायाधीश (निधन: २३ मार्च २०२२)
१९३४: देबी घोसाल — भारतीय राजकारणी, खासदार (निधन: ५ ऑगस्ट २०२२)
१९३२: अरुण कोलटकर — भारतीय इंग्रजी व मराठी कवी (निधन: २५ सप्टेंबर २००४)

मृत्यू

२०२२: विजयकुमार मेनन — भारतीय कला समीक्षक, लेखक आणि अनुवादक
२००७: एस. अली रझा — भारतीय दिग्दर्शक आणि पटकथा लेखक (जन्म: ९ जानेवारी १९२५)
२००५: योगिनी जोगळेकर — भारतीय लेखिका (जन्म: ६ ऑगस्ट १९२५)
१९९६: ज्युनिअस जयवर्धने — श्रीलंकेचे २रे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १७ सप्टेंबर १९०६)
१९९४: कॉम्रेड दत्ता देशमुख — भारतीय शेतीतज्ज्ञ आणि कामगार नेते
१९९३: नैनोदेवी — भारतीय ठुमरी, दादरा व गझल गायिका
१९९१: अरुण पौडवाल — भारतीय संगीतकार व संगीत संयोजक
१९८८: गोविंदस्वामी आफळे — भारतीय ज्येष्ठ राष्ट्रीय कीर्तनकार
१९५०: बिभूतिभूषण बंदोपाध्याय — भारतीय बंगाली साहित्यिक (जन्म: १२ सप्टेंबर १८९४)
१८७३: दीनबंधू मित्र — भारतीय बंगाली नाटककार

आजचे सुविचार

- परिस्थिती कितीही कठीण असली, तरी जिद्द असेल तर मार्ग नक्की सापडतो.
- वेळेचा योग्य उपयोग करणारा माणूसच आयुष्यात यशस्वी होतो.
- विचार सकारात्मक असतील, तर प्रत्येक दिवस नवी संधी घेऊन येतो

दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

०१ नोव्हेंबर

छत्तीसगड राज्य - हे भारताचे २६ वे राज्य बनले

छत्तीसगड हे भारताच्या मध्य भागातील एक महत्त्वाचे राज्य आहे. १ नोव्हेंबर २००० रोजी मध्य प्रदेश राज्याचे विभाजन होऊन छत्तीसगडची स्वतंत्र राज्य म्हणून निर्मिती झाली. हे भारताचे २६ वे राज्य ठरले. रायपूर ही या राज्याची राजधानी आहे.स्वतंत्र छत्तीसगड राज्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात होती. या प्रदेशाची स्वतंत्र सांस्कृतिक ओळख, भौगोलिक परिस्थिती आणि विकासाच्या वेगळ्या गरजा लक्षात घेऊन स्वतंत्र राज्याची मागणी पुढे आली. अखेर केंद्र सरकारने मध्य प्रदेश पुनर्रचना अधिनियम, २००० मंजूर केला आणि १ नोव्हेंबर २००० रोजी छत्तीसगड राज्य अस्तित्वात आले.छत्तीसगडच्या उत्तरेला उत्तर प्रदेश आणि झारखंड, पूर्वेला ओडिशा, दक्षिणेला तेलंगणा, तर पश्चिमेला महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश ही राज्ये आहेत. महानदी ही राज्यातील प्रमुख नदी आहे. शिवनाथ, इंद्रावती आणि हसदेव या इतर महत्त्वाच्या नद्या आहेत. राज्यात मोठ्या प्रमाणावर जंगले, डोंगररांगा आणि नैसर्गिक संपत्ती आढळते.खनिज संपत्तीच्या बाबतीत छत्तीसगड हे देशातील समृद्ध राज्यांपैकी एक आहे. येथे लोहखनिज, कोळसा, बॉक्साइट, चुनखडी आणि डोलोमाइट यांचे मोठे साठे आहेत. भिलाई येथील पोलाद कारखाना देशातील प्रमुख औद्योगिक केंद्रांपैकी एक आहे. कोरबा हे वीजनिर्मिती आणि कोळसा उद्योगासाठी प्रसिद्ध आहे. पोलाद, सिमेंट आणि ऊर्जा निर्मिती हे राज्यातील महत्त्वाचे उद्योग आहेत.शेती हा छत्तीसगडमधील प्रमुख व्यवसाय आहे. भात हे येथील मुख्य पीक असल्यामुळे छत्तीसगडला 'धानाचे कोठार' असेही म्हटले जाते. याशिवाय मका, डाळी आणि तेलबियांचे उत्पादन घेतले जाते.छत्तीसगडमध्ये आदिवासी समाजाची लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर आहे. गोंड, बैगा, मुरिया आणि हल्बा या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. त्यांची लोककला, नृत्य, संगीत, हस्तकला आणि पारंपरिक सण राज्याच्या सांस्कृतिक वैभवात भर घालतात. बस्तर दशहरा हा येथील प्रसिद्ध उत्सव आहे.पर्यटनाच्या दृष्टीनेही छत्तीसगड महत्त्वाचे आहे. चित्रकोट धबधबा, तीरथगड धबधबा, बस्तर, सिरपूर येथील प्राचीन मंदिरे आणि बारनवापारा वन्यजीव अभयारण्य ही प्रमुख पर्यटनस्थळे आहेत.खनिज संपत्ती आणि औद्योगिक विकासाच्या मोठ्या संधी असूनही राज्यासमोर गरिबी, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्य आणि दुर्गम भागांच्या विकासाची आव्हाने आहेत. काही भागांमध्ये नक्षलवादाचाही प्रश्न गंभीर राहिला आहे.स्वतंत्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर छत्तीसगडने औद्योगिक, कृषी आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात प्रगती केली आहे. समृद्ध नैसर्गिक संपत्ती, आदिवासी संस्कृती आणि औद्योगिक क्षमतेमुळे छत्तीसगडला भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

डॉ. नरेंद्र दाभोलकर : अंधश्रद्धेविरुद्ध आयुष्यभर लढा देणारे समाजसुधारक

जन्मदिन विशेष

डॉ. नरेंद्र दाभोलकर हे महाराष्ट्रातील ज्येष्ठ समाजसुधारक, विचारवंत आणि अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे प्रमुख नेते होते. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकवाद आणि मानवतावादी विचार रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी अंधश्रद्धा आणि अनिष्ट रूढींविरोधात मोठी जनजागृती केली.डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा जन्म १ नोव्हेंबर १९४५ रोजी सातारा येथे झाला. त्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून डॉक्टर म्हणून व्यवसाय सुरू केला. मात्र, समाजातील अंधश्रद्धा, बुवाबाजी, भोंदूगिरी आणि अज्ञानामुळे होणारे शोषण पाहून त्यांनी सामाजिक कार्याला प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला. १९८२ पासून त्यांनी पूर्णवेळ सामाजिक कार्य सुरू केले.१९८९ मध्ये त्यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रभर अंधश्रद्धा

निर्मूलनाचे काम सुरू केले. चमत्कारांच्या नावाखाली लोकांची फसवणूक करणाऱ्या भोंदू बाबांचा पर्दाफाश करणे, जादूटोणा आणि काळ्या जादूच्या नावाखाली होणारे शोषण थांबवणे, तसेच समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे, हे त्यांच्या कार्याचे प्रमुख उद्दिष्ट होते.दाभोलकर यांनी गावोगावी जाऊन व्याख्याने, प्रबोधनपर कार्यक्रम आणि जनजागृती मोहिमा राबवल्या. चमत्कार समजल्या जाणाऱ्या घटनांमागील वैज्ञानिक कारणे त्यांनी लोकांसमोर मांडली. अंधश्रद्धेमुळे अनेकदा गरीब आणि सामान्य नागरिकांची आर्थिक तसेच मानसिक फसवणूक होते, हे त्यांनी आपल्या कार्यातून स्पष्ट केले. समाजाने कोणत्याही गोष्टीवर आंधळेपणाने विश्वास न ठेवता प्रश्न विचारावेत आणि विवेकाने विचार करावा, असा त्यांचा आग्रह होता.त्यांनी लेखनाच्या माध्यमातूनही समाजप्रबोधन केले. अंधश्रद्धा, विवेकवाद आणि सामाजिक प्रश्नांवर त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. 'अंधश्रद्धा : प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम', 'असे कैसे झाले भोंदू' आणि 'विचार तर कराल?' ही त्यांची काही महत्त्वाची पुस्तके आहेत. तसेच 'साधना' साप्ताहिकाच्या माध्यमातूनही त्यांनी सामाजिक विषयांवर लेखन केले.अंधश्रद्धा आणि जादूटोणाविरोधी कायदा महाराष्ट्रात लागू व्हावा, यासाठी त्यांनी अनेक वर्षे प्रयत्न केले. या कायद्याला विरोध होत असतानाही त्यांनी आपली भूमिका ठामपणे मांडली. २० ऑगस्ट २०१३ रोजी पुण्यात सकाळी फिरायला गेले असताना अज्ञात हल्लेखोरांनी त्यांची गोळ्या झाडून हत्या केली. त्यांच्या हत्येमुळे संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. त्यांच्या निधनानंतर अवघ्या चार दिवसांत महाराष्ट्र सरकारने अंधश्रद्धा निर्मूलनासंदर्भातील अध्यादेश काढला.समाजप्रबोधनासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल भारत सरकारने त्यांना २०१४ मध्ये मरणोत्तर पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे कार्य आजही अनेक सामाजिक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे. अंधश्रद्धेपेक्षा विज्ञान, अज्ञानापेक्षा ज्ञान आणि आंधळ्या श्रद्धेपेक्षा विवेकाला महत्त्व देणारा समाज निर्माण करण्याचे त्यांचे स्वप्न आजही समाजासमोर एक महत्त्वाचे ध्येय म्हणून उभे आहे.

दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2026-28

पथविक्रेत्यांना व्यवसायाची संधी अतिक्रमणाला मात्र बंदी!

सणासुदीच्या काळात नगरपालिकेकडून दिलासा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दिवाळीसह इतर सण-उत्सवांच्या काळात छोट्या व्यावसायिकांना व्यवसायाची संधी मिळावी आणि त्यांच्या कुटुंबीयांनाही सणांचा आनंद घेता यावा, यासाठी संगमनेर नगरपरिषद सकारात्मक आहे. अधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांना कोणत्याही प्रकारचा विनाकारण त्रास दिला जाणार नाही. मात्र, नोंदणी नसलेल्यांना सार्वजनिक ठिकाणी व्यवसाय करण्याची परवानगी दिली जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका नगरपरिषदेने घेतली आहे.

नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली छोट्या व्यावसायिकांचे हित जपतानाच शहरातील वाहतूक, स्वच्छता आणि सार्वजनिक व्यवस्था सुरळीत ठेवण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

नगरपरिषदेकडे पथविक्रेता समितीच्या माध्यमातून एकूण ८८१ पथविक्रेते नोंदणीकृत आहेत. या सर्व नोंदणीकृत पथविक्रेत्यांना नियमानुसार व्यवसाय करता येणार असून,

त्यांच्या व्यवसायात कोणताही अडथळा निर्माण केला जाणार नाही किंवा विनाकारण त्रास दिला जाणार नाही. मात्र, नोंदणी नसलेल्यांना शहरातील सार्वजनिक ठिकाणी व्यवसाय करण्याची परवानगी राहणार नाही.

दिवाळीच्या काळात फुले, पणत्या, दिवे, आकाशकंदील, रांगोळीचे साहित्य तसेच इतर सणोपयोगी वस्तूंची विक्री करणाऱ्या हंगामी व्यावसायिकांनाही आवश्यक परवानगी घेऊन नगरपरिषदेने निश्चित केलेल्या जागेत व्यवसाय करता येणार आहे. यासाठी जागेची मर्यादा ४ ÷ ४ फूट निश्चित करण्यात आली असल्यास त्यापेक्षा अधिक जागा व्यापता येणार नाही.

व्यवसाय करताना रस्ते, चौक आणि पदपथांवर अतिक्रमण करून वाहतुकीला किंवा पादचाऱ्यांना अडथळा निर्माण होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. विक्रेत्यांनी व्यवसायाच्या ठिकाणी स्वच्छता राखावी, कचरा करू नये तसेच नागरिकांना त्रास होईल किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, असे कोणतेही कृत्य करू नये.

सणासुदीच्या काळात कष्टकरी व्यावसायिकांना रोजगाराची संधी मिळावी, ही नगरपरिषदेची भूमिका आहे. त्यामुळे नियमानुसार व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांना प्रशासनाकडून सहकार्यच केले जाईल. मात्र, विनापरवाना व्यवसाय, निश्चित जागेपेक्षा अधिक जागेचा वापर किंवा अतिक्रमण केल्यास नियमानुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाईल.

कोणालाही नियमबाह्य सवलत दिली जाणार नाही, असे नगरपरिषदेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

दर्जाबाबत तडजोड खपवून घेणार नाही- आ. खताळ

विधी महाविद्यालय ते एकता चौक रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - दिवाळीला अवघे काही दिवस शिल्लक असल्याने ठेकेदाराने या रस्त्याच्या कामाला तातडीने सुरुवात करावी. निधी आपण उपलब्ध करून देतो; मात्र रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यास बदनामी लोकप्रतिनिधींची होते. त्यामुळे या रस्त्याचे काम दर्जेदार झाले पाहिजे दर्जाबाबत अजिबात तडजोड खपवून घेतली जाणार नाही अशी तंबी आमदार अमोल खताळ यांनी ठेकेदाराला दिली .

संगमनेर विधी महाविद्यालय ते एकता चौक हा रस्ता गेल्या अनेक दिवसांपासून खराब झाला होता. या रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी आमदार खताळ यांच्या माध्यमातून ४० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामाचा शुभारंभ आमदार खताळ आणि स्थानिक नागरिकांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी कैलास काशिद, संजय पानसरे, स्वरूप राऊत, शिवाजी दुशिंग प्रा. डॉ. अशोक लिंबेकर प्रा. प्रवीण रत्नपारखी, प्रा. संजय दळवी संदीप गुंजाळ, रोशन कोथमिरे, सिताराम पानसरे, विलास राऊत, स्वप्नील राऊत, तुषार राऊत, वैशाली राऊत, सारंग पानसरे, शरद पानसरे, ड. गोरक्ष कापकर, सचिन फटांगरे, सुरेश ढोकरे, नंदकुमार देशपांडे विशाल पावसे, निखिल शेळके, मुन्ना पुंड, रवी म्हस्के, सौरभ देशमुख, सुशील शेवाळे, शशांक नामन, भैय्या सातपुते, युवराज सातपुते, अक्षय वर्पे, दिपाली वाव्हळ, राहूल भोईर यांच्यासह शिवसेना महायुतीचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते व परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

घुलेवाडीचा पाणीप्रश्न सोडविण्याचा निर्धार

रस्त्याबरोबरच घुलेवाडी परिसरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर आहे. शहरालगत असलेल्या या परिसराला पुरेसा पाणीपुरवठा व्हावा, यासाठी यापूर्वीच नियोजन होणे अपेक्षित होते. मात्र, पाण्याच्या प्रश्नाकडे पुरेसे लक्ष दिले गेले नसल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. पाणी साठवणुकीच्या कामांना प्राधान्य देण्याची गरज व्यक्त करताना आमदार खताळ म्हणाले की, संबंधित योजनेची कामे अपेक्षित गतीने पूर्ण झाली पाहिजेत. केवळ पाईपलाइन टाकणे किंवा बिले काढण्यापुरती कामे मर्यादित न राहता पाणी साठवणुकीची व्यवस्था वेळेत पूर्ण होणे आवश्यक असल्याचे आ. अमोल खताळ यांनी सांगितले.

आमदार खताळ म्हणाले की, साडेतीन ते चार वर्षांपूर्वी या रस्त्याचे काम करण्यात आले होते. मात्र, त्याच वेळी कामाचा दर्जा निकृष्ट असल्याचे आपल्या निदर्शनास आले होते. त्यानंतर रस्त्यावर खड्डे पडू लागले, तरीही अपेक्षित दुरुस्ती झाली नाही. रस्त्याच्या दोषनिवारण कालावधीतच संबंधित ठेकेदाराकडून दुरुस्ती करून घेतली असती, तर नागरिकांना वारंवार त्रास सहन करावा लागला नसता. या रस्त्यावरून अनेक शाळांच्या बस, दूध उत्पादक शेतकरी, नागरिक तसेच शाळा-महाविद्यालयांत जाणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने प्रवास करतात. त्यामुळे रस्त्याची दुरवस्था ही केवळ वाहतुकीची समस्या नसून नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित बाब आहे. रस्त्यावर खड्डे पडल्यानंतर मुरूम टाकून तात्पुरती डागडुजी करण्यात आली होती. मात्र, कोणतेही विकासकाम करताना पारदर्शकता आणि गुणवत्ता या दोन बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

रस्त्याच्या कामाबाबत काही जणांनी समाजमाध्यमांवर चुकीच्या पोस्ट टाकल्याचा उल्लेखही त्यांनी केला. विकासकामांसाठी निधी मिळवताना प्रत्यक्षात किती प्रयत्न करावे लागतात, याची जाणीव असणे आवश्यक आहे.

घुलेवाडी परिसरातील सध्याच्या रस्त्यापुरतेच मर्यादित न राहता साई श्रद्धा चौकातून पुढे जाणारा रस्ता तसेच समनापूरपर्यंतचा रस्ता सिमेंट काँक्रिटीकरण करण्याचा आपला विचार आहे. या कामांसाठी काही बाबी टप्प्याटप्प्याने पूर्ण कराव्या लागतील. मात्र, भविष्यातील वाहतूक आणि वाढती लोकवस्ती लक्षात घेऊन रस्त्यांचे नियोजन करणे आवश्यक आहे. शहरालगतच्या या भागात लोकवस्ती मोठ्या प्रमाणात वाढली असून, शाळा, महाविद्यालये आणि दैनंदिन व्यवसायानिमित्त नागरिकांची ये-जा वाढली आहे.

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25